गुरुवार, 11 ऑगस्ट 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 17
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●THURSDAY 11 AUGUST 2022 adhunikkesari.com Adhunik Kesari ●YEAR-02 ●ISSUE-17 ●TITLE CODE : MAHMAR51117 ●PAGE-10 ●PRICE-5

# २०१४ मध्ये जिंकले, पण २०२४ मध्ये ?

## नितीश कुमारांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना खोचक टोला !

आधुनिक केसरी न्यूज

**पटणा : बिहारमध्ये झालेल्या राजकीय भूकंपानंतर जदयुचे अध्यक्ष नितीश कुमार यांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. त्यांच्यासोबत राजदचे तेजस्वी यादव यांचा देखील शपथविधी पार पडला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी २०१४ मध्ये जिंकले, पण २०२४ मध्ये ते जिंकतील का?, अशा शब्दांत नितीश कुमार यांनी अप्रत्यक्षपणे पंतप्रधान नरेंद्र मोदींनाच आव्हान दिल्याचे बोलले जात आहे. भाजपाशी काडीमोड घेऊन राजदशी संसार थाटत नितीश कुमार यांनी पुन्हा एकदा राजकारणात काहीही अशक्य नसल्याचंच दाखवून दिलं आहे. २०१७ मध्ये काहीही झाले तरी राजदसोबत जाणार नाही, म्हणणारे नितीश कुमार आज त्यांच्याच पाठिंब्यावर पुन्हा मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींनाच जाहीर आव्हान दिले आहे.**

२०२४ सालच्या कोणत्याही पदासाठी आमची दावेदारी नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी २०१४ मध्ये जिंकले, पण २०२४ मध्ये ते जिंकतील का?, अशा शब्दांत नितीश कुमार यांनी अप्रत्यक्षपणे पंतप्रधान नरेंद्र मोदींनाच आव्हान दिल्याचे बोलले जात आहे. नितीश कुमार यांनी भाजपाची साथ सोडल्यानंतर त्यावर राजकीय वर्तुळात प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. खुद्द भाजपामधून यासंदर्भात सुरुवातीला आश्चर्य वाटल्याच्या प्रतिक्रिया आल्या. त्यापुढे राजदशी हातमिळवणी केल्यानंतर नितीश कुमार यांच्यावर भाजपाने जोरदार टीका केली. या पार्श्वभूमीवर नितीश कुमार यांनी भाजपाची साथ सोडण्याचे नेमके कारण काय ठरले? याविषयी तर्क लावले जाऊ लागले होते. यासंदर्भात आता खुद्द नितीश कुमार यांनीच स्पष्टीकरण दिले आहे.

निवडणूक काळात त्यांचे (भाजपा) वागणे योग्य नव्हते. आमच्या लोकांनी त्यांना पाठिंबा दिला. पण



त्यांच्याकडून जदयूला हरवण्यासाठीच प्रयत्न केले गेले. मी आमच्या पक्षातील सर्वांशी चर्चा केली. सगळ्यांच्याच मनात या आघाडीत राहायला नको हीच भावना होती. म्हणून भाजपाची साथ सोडण्याचा निर्णय घेतला, असे नितीश कुमार म्हणाले आहेत.

### वाजपेयींबद्दल व्यक्त केला आदर

दरम्यान, यावेळी बोलताना नितीश कुमार यांनी माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्याविषयी आदर व्यक्त केला. अटल बिहारी वाजपेयींकडे आम्ही सगळे गेलो होतो. ते आम्हाला फार मानत होते. आम्ही ते कधीही विसरू शकत नाही. वाजपेयी आणि इतरांनी दिलेले प्रेम आम्ही विसरू शकत नाही, असे नितीश कुमार यांनी नमूद केले.

### पंतप्रधान पदासाठी दावेदारी नाही

नितीश कुमार यांनी भाजपाशी आघाडी तोडून राज्यात नवे सरकार स्थापन केल्यानंतर त्यांना थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींना आव्हान देणारा विरोधी पक्षांचा चेहरा म्हणून पाहिले जाऊ लागले होते. २०२४ मध्ये ते मोदींच्या विरोधात निवडणूक लढवणार असल्याची देखील चर्चा रंगली होती. मात्र, पंतप्रधान पदाच्या उमेदवारीमध्ये आपल्याला रस नसल्याचे नितीश कुमार यावेळी म्हणाले.

### नितीश कुमार यांनी घेतली शपथ

बिहारमध्ये जनता दल युनायटेड आणि राजदप्रणित महागठबंधन यांचे संयुक्त सरकार स्थापन झाले. यावेळी नितीश कुमार यांनी आठव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली तर तेजस्वी यादव यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. भाजपला सोडचिठ्ठी देत नितीश कुमार यांनी महागठबंधनसोबत नवे सरकार स्थापन केले आहे. राजभवन येथील या शपथविधी सोहळ्याला लालू प्रसाद यादव यांच्या कुटुंबातील सदस्य तेजस्वी यादव यांच्या पत्नी राजश्री यादव, माजी मुख्यमंत्री राबडी देवी तसेच राजदचे नेते तेज प्रताप यादव हे देखील उपस्थित होते.

## चर्चेतली बातमी

### पक्षाचे चिन्ह काढून घेणे अयोग्य : शरद पवार



आधुनिक केसरी न्यूज

**बारामती :** धनुष्यबाण हे शिवसेनेचे चिन्ह आहे, बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या आणि तेव्हापासून स्वीकारलेल्या आणि महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात असलेल्या एखाद्या राजकीय पक्षाचे चिन्ह काढून घेणे योग्य नसल्याची भूमिका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज मांडली. बारामती येथे पत्रकारांशी बोलताना शरद पवार म्हणाले की, एकनाथ शिंदे यांना दुसरा पक्ष काढायचा असेल तर ते जरुर काढू शकतात, दुसरे चिन्हही ते घेऊ शकतात. मी देखील काँग्रेसमधून बाहेर पडलो तेव्हा आम्ही नवीन पक्ष स्थापन केला. घड्याळ हे चिन्ह घेतले, आम्ही वाद वाढवला नाही, पण धनुष्यबाणाबाबत काही ना काही काढून वाद वाढविण्याची भूमिका कोणी घेत असेल तर लोकच त्याला पाठिंबा देणार नाहीत. लोकसभेचे अधिवेशन चालविण्याबाबतची आस्था केंद्र सरकारमध्ये गेल्या काही वर्षांपासून आहे, असे आम्हाला जाणवत नाही.

# पूरग्रस्तांसाठी मोठा निर्णय; हेक्टरी १३,६०० रुपये मदत जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील पूरग्रस्तांसाठी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये एनडीआरएफच्या निकषांपेक्षा दुप्पट मदत जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार पूरग्रस्तांना आता हेक्टरी १३,६०० रुपये मदत मिळणार आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, गेल्या काही दिवसांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिकांचे मोठे नुकसान झाले होते. यामध्ये १५ लाख हेक्टर किंवा त्यापेक्षा जास्त नुकसान होऊ शकते किंबहुना आत्तापर्यंत आलेल्या १५ लाख हेक्टर शेतीच्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना-भाजप युतीने विशेष बाब म्हणजे आत्तापर्यंत कधीही नुकसान भरपाई मिळाली नव्हती तेवढी म्हणजे एनडीआरएफच्या नियमांप्रमाणे जेवढी मदत दिली जात होती त्यापेक्षा दुप्पट मदत देण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. त्याचबरोबर दोन हेक्टरची मर्यादा वाढवून ती तीन हेक्टरपर्यंत करण्यात आली आहे. त्यामुळे अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल. एनडीआरएफच्या नियमानुसार ६,८०० रुपये मिळत होते. त्यापेक्षा दुप्पट म्हणजे १३,६०० रुपये प्रति हेक्टर इतकी मदत देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

# जम्मू काश्मिरमधील बडगाममध्ये चकमक

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीनगर :** जम्मू काश्मिरमधील बडगाम भागात बुधवारी (१० ऑगस्ट) पहाटे सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. सैन्याने लष्कर-ए-तोयबाच्या तीन दहशतवाद्यांची नाकेबंदी केली आहे. यात कुप्रसिद्ध लतिफ रादर या दहशतवाद्याचाही समावेश आहे. त्याच्यावर राहुल भट, अमरीन भटसह अनेक नागरिकांच्या हत्येचा आरोप आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. या कारवाईबाबत माहिती देताना काश्मीर विभागीय पोलिसांनी सांगितले, बडगाममध्ये सुरक्षा दल आणि लष्कर-ए-तोयबाच्या दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू आहे. पोलिसांनी तीन दहशतवाद्यांना घेरले आहे. हे दहशतवादी राहुल भट, अमरीन भटसह अनेक नागरिकांच्या हत्येत सहभागी होते. पहाटेपासून बडगाममधील वॉटरहेलमध्ये ही चकमक सुरू आहे.

# माझा भारत महान आहे... परंतु...?

आधुनिक केसरी

पंधरा ऑगस्टला भारताला स्वातंत्र्य मिळाले त्याला चक्क पंचाहत्तर वर्ष पूर्ण होत आहेत. अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण झालेले आहे. पंधरा ऑगस्ट 1947 ला भारताला पारतंत्र्यातुन मुक्ती मिळाली. आपण स्वतंत्र झालोत म्हणजे नेमके काय झाले? तर आपण इंग्रजांचे अधिपत्याखालून मोकळे झालोत. पण त्या ब्रिटिशांनी आपल्याला स्वातंत्र देताना मनमोकळेपणाने, सुलभतेने, आणि आनंदाने न देता भारताचे तुकडे केले. पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान हे मुस्लिम बहूल भूभाग वेगळा करून जम्मु काश्मीर वादग्रस्त करून ठेवला. तरीही विनायक दामोदर सावरकर, सरदार वल्लभभाई पटेल, लोकमान्य टिळक, सुभाषचंद्र बोस, लाल, पाल आणि बाल, भगतसिंग, राजगुरू, चंद्रशेखर आझाद अशा असंख्य स्वातंत्र्य योध्दांचे बलीदान, साहस, असहकार, अशी शस्त्रे वापरत इंग्रजांना नाकीनऊ आणले होते. मग मोहनदास करमचंद गांधी (महात्मा गांधी) पंडित जवाहरलाल नेहरू, यांनी श्रेयासह स्वातंत्र्य मिळवले.

आज आपण पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाचे नरेंद्र मोदी यांचे नेतृत्वाखाली स्वातंत्र्य लढा लढत आहोत तो भ्रष्ट, स्वार्थी, घरभेदी, देशद्रोही राजकीय धुरीणांचे कचाट्यातून देशाला सहीसलामत बाहेर काढून खऱ्या अर्थाने स्वतंत्र, विकासाभिमुख, प्रगत आणि तळागाळातील जनतेच्या सहभागातून उत्कर्ष साधण्यासाठी लढत आहोत. 1947 ते 2014 या सदुसष्ट वर्षातील सहा सात वर्षांचा अपवाद सोडता अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सरकार होते. फक्त मध्यंतरी आणीबाणी नंतर मोरारजी देसाई, चरणसिंग, देवेगौडा, चंद्रशेखर ही नगण्य सरकारे सत्तेत होती. पण उल्लेखनीय सरकार भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचे होते. त्यांच्या साडेचार वर्षांचे कारकिर्दीत भारत प्रगतीपथावर होता. मुद्दा हा की काँग्रेस सरकारांनी देशाचा विकास करतांना, प्रगती करतांना, धोरणात्मक निर्णय घेताना बोटचेपे धोरण राबवले. चीन, पाकिस्तानी दहतवाद, जागतिक राजकीय परिस्थिती यांचे दबावाखाली काम करताना घाबरत धोरणे राबवली. ठरवुन 'व्हिजन' राबवले नाही. जगाच्या रेट्या नुसार होत आलेली प्रगती साधली.

पाकव्याप्त काश्मीरचा डाग 1971 चे युध्दात दैदिप्यमान विजय मिळवूनही नाही पुसला. वाटाघाटीत नुकसान करून घेतले. परिणामी आजही जम्मु काश्मीर एक संघ भारताचे ताब्यात नाही. अकारण आलेली संधी घालवली आणि आपला स्वर्ग दुभंगलेलाच आहे. आता हीच काँग्रेस ची मंडळी नरेंद्र मोदींवर पीओके परत मिळवण्यासाठी दबाव आणत आहेत. हे असले तरी आपण स्वतंत्र झालोत हा आनंद आहेच आणि नियतीचा सुड असा असतो की आज भारत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना तिकडे ब्रिटीश राजसत्ता भारतीयाच्याच हातात येण्याचा योग येत आहे. ऋषी सुनक हे आपल्या सुधा मूर्ती आणि इंफोसिसचे मुर्ती यांचे जावई आहेत. आणि इंग्लंडचे पंतप्रधान होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. 2014 ते 2022 या आठ वर्षातील भारताची जी अचिव्हमेंट आहे ती जगाला अचंबित करणारी आहे. आज नरेंद्र मोदी जगाचे नायक झाले आहेत. त्यांच्या राजकीय चाली, अंतरराष्ट्रीय प्रश्नांचा अभ्यास, भारताचे हित जपण्याची कला, प्रभावी व्यक्तिमत्त्व दृष्ट लागण्यासारखे काम करत आहे. दि.13/14/15 ऑगस्ट हे तीन दिवस देशभर घराघरावर आपला राष्ट्रध्वज तिरंगा डौलाने फडकणार असून जग भारतीय जनतेची ऐकी आणि देशप्रेम अनुभवणार आहे. हा अमृत महोत्सव उत्सव कोण्या एका पक्षाचा नसून तमाम भारतीय नागरिकांचा आहे. सर्व थरातील सर्व जातीधर्माच्या भारतीय देशप्रेमी बंधुभगिनींचा हा उत्सव आहे.




प्रकाश महागावकर

हा उत्सव साजरा करताना जसे आपण होळी उत्सवात वाईट, गैर जाळून टाकून नव्या जोमाने, समंजस, सभ्य, जीवन जगण्याचा संकल्प सोडतो तसा या अमृत महोत्सवी उत्सवात आपण सर्व भारतीय शपथ घेऊयात की मी भ्रष्टाचार करणार नाही. देशाच्या प्रगतीत, विकासात मी अडथळा ठरणार नाही. लोकाभिमुख आणि विकासाभिमुख सरकारला सर्वोतोपरी सहकार्य करून माझ्या देशासाठी मी समर्पन भावनेने समर्थन देईन. देशद्रोही, दहशतवादी, आतंकी आणि परकीय शत्रुंसह घरभेद्यांना थारा देणार नाही. कोणताही भारतीय राजकीय पक्ष धुतल्या तांदळा सारखा स्वच्छ नाही. कारण 1947 ते 1971 हा कालखंड तुलनेने चांगला होता. फार मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार बोकाळलेला नव्हता. विकास, प्रगती कासव गतीने का होईना पण होत होता. इतर देशांचे तुलनेत मागास असलोत तरी विकसनशील होतोत. 1971 नंतर बांगलादेश स्वातंत्र्य युध्दातील विजयाने इंदिराजींच्या डोक्यात यश भीनले, नाकात वारे शिरले आणि बेबंदशाही उदयाला आली. भ्रष्टाचार, गैरव्यवहार, पैशांचे महत्व वाढत गेले. परिणामी 1975 मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिराजींचे विरोधात निकाल देताच मस्तीतील इंदिरा गांधी यांनी आणीबाणी लादली. परिणामी दडपशाही करून विरोधी पक्षनेत्यांना आणि स्व पक्षातील काही तरूणतूर्कांना अठरा ते वीस महीने जेल मध्ये डांबण्यात आले. याच काळात जनतेच्या पैशांची लूट जोमाने सुरू झाली. आणि जशी महागाई वाढल्या नंतर सरकारने कितीही नियंत्रणे आणून, वेगवेगळे निर्णय घेऊन दर, भाव कंट्रोल मध्ये आणण्याचा प्रयत्न केला तरी वाढलेले भाव पून्हा कमी होत नाहीत. ही वृत्तीच नाही भारतीय व्यवसायीकांच्या वागणुकीत. भ्रष्टाचारी राज्यकर्त्यांमुळे सरकारे बुडवण्याची, ओझे वाटण्याची मानसिकता वाढत गेली. हे बदलायला हवे. प्रत्येक भारतीयाने (स्त्री असो नाही तर पुरूष किंवा तृतीय पंथी) स्वतः बदलायचे ठरवले तर आणि शासनाने शिक्षण पध्दतीत, अभ्यासक्रमात आवश्यक बदल केले तर येणारी पिढी राष्ट्रप्रेमी निपजू शकते. इतिहास हा वास्तव, देशाभिमान शिकवणारा आणि आदर्श व्यक्तीमत्वाचा जीवन प्रवास शिकवणारा, रोजगार निर्मितीचा आणि उपजिविकेला उत्थान देणारा राबवावा. आम्ही लहानपणी, भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत, माझ्या देशावर माझे प्रेम आहे, माझ्या देशातला विविघतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे, ही प्रार्थना रोज म्हणत होतोत. नकळत त्याचा परिणाम मनावर होत होता. ती प्रतिज्ञा घेणे आता बंद झाले आहे. सुधारणांना खुप वाव आहे. निवडणूक खर्चिक बाब आहे. त्यामुळे राजकारण व्यवसाय झाला आहे. लोक इन्व्हेस्टमेंट म्हणून खर्च करतात आणि निवडून आले की फक्त वसूलीचाच विचार करतात. परिणामी जनक्षोभ होत नसल्याने सुसाट पैसावसूलीच्या आणि पुढील निवडणूक खर्चाची बेगमी करण्यातच कौशल्य वापरले जाते. त्यामुळे निवडणूक पध्दतीत बदल होणे गरजेचे असून, निवडणूक खर्च नियंत्रणात आणला पाहिजे. शेवटी राष्ट्र सर्वोतोपरी ही भावना रुजवणे गरजेचे आहे. आणि हे संस्कारक्षम वयातच करण्यासाठी शिक्षण पध्दत आणि अभ्यासक्रम बदलला पाहिजे. 15 ऑगस्ट 2022 ते 15 ऑगस्ट 2023 या आगामी वर्षात स्व बदल वर्षे साजरे करावे आणि प्रत्येक भारतीयाने शॉर्टकटने, गैर मार्गाने, भ्रष्ट विचाराने वागणे बंद करण्याचा संकल्प सोडून त्याचे प्रतिक म्हणून दि. 13 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट 2022 हे तीन दिवस आपापले घरावर, कार्यालयावर, उद्योग व्यवसायाचे जागेवर पवित्र तिरंगा फडकवावा आणि आम्ही एकमताने एकदिलाने सुधारणा यज्ञात सहभागी झाल्याचे निदर्शनास आणून द्यावे.

(शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड औरंगाबाद)






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# देवघरातील निरांजने...

आधुनिक केसरी

याचा अर्थ असा नाही की पुरुषाचा आपल्या घरासाठी त्याग नसतो. तोही शक्य तेवढे करतच असतो. पण स्त्रीचा घरासाठी असलेला त्याग त्याच्या एक पाऊल पुढे नक्कीच असतो. बऱ्याच वेळा शक्य असेल तेव्हा बाबा मुलांना शाळेत सोडायला जातो. पण जेव्हा बाबाला हे शक्य नसेल, तेव्हा आजची आई राणी लक्ष्मीबाईसारखी मुलाला पाठीशी घेऊन शाळेत सोडायला जाते, घ्यायला जाते. तीही आपली कामे सांभाळून. कधी कधी शाळेत पालक सभा असते. अशा वेळी त्या सभेला आईच पालक म्हणून जाते कारण बाबांना वेळ नसतो. घरी मुलांचा अभ्यास घेणे, त्यांना हवे नको ते पाहणे या गोष्टीदेखील जणू तिचीच जबाबदारी. या सगळ्या गोष्टी करता करता तिची प्रचंड दमणूक होत असते. ती शारीरिक आणि मानसिक दृष्ट्याही थकते . अशा वेळी तिला हवे असतात ते प्रेमाचे दोन शब्द. पतीचे आणि मुलांचे. ' तू किती करतेस आमच्यासाठी ..! ' या शब्दांसाठी जणू ती आसुसलेली असते. ते शब्द जणू तिच्यावर जादू करतात आणि ती नवीन उत्साहाने कामाला लागते. कधी कधी आपल्याला फिरायला घेऊन जावे अशीही तिची अपेक्षा असते. आणि या तिच्या अपेक्षा तिच्या जोडीदाराने पूर्ण करणे, तिला आनंदी ठेवणे ही त्याचीही जबाबदारी असते . कारण घर दोघांचे असते. संसार दोघांचा असतो.

स्त्रीची आई, बहीण, प्रेयसी, सखी, मैत्रीण, गृहिणी ही सगळीच रूपे तशी विलोभनीय.पण मला सर्वात जास्त आवडणारे स्त्रीचे रूप म्हणजे आईचे. या नात्याची तुलनाच होऊ शकत नाही. मनुष्यच काय सृष्टीतील अवघ्या प्राणिमात्रांमध्ये आईचे हे वात्सल्य आपल्याला अनुभवास येते. या अर्थाने आईचे हे रूप वैश्विक आहे. म्हणूनच या विश्वमाता रुपाला मनःपूर्वक सलाम. स्त्री असते म्हणून घराचे घरपण टिकून असते. आई असते घरातील प्रकाश. घरातील चैतन्य. देवघर उजळणारी निरांजन .

पुरुषांच्या जोडीने खांद्याला खांदा लावून सर्व क्षेत्रात आपले अमूल्य योगदान देणाऱ्या सगळ्या कर्तृत्वान महिलांना समर्पित.

( आनंदाच्या गावा जावे या नुकत्याच प्रकाशित झालेल्या पुस्तकातून साभार )



## आनंदी पहाट

# मुलांच्या जीवनात सतत होणारा हस्तक्षेप टाळावा

आधुनिक केसरी

चांगल्या चारित्र्यामध्ये निष्ठा, प्रामाणिकपणा, धैर्य, सचोटी, शौर्य आणि चांगल्या वागणुकीला प्रोत्साहन देणारे इतर महत्त्वाचे गुण समाविष्ट असतात. चांगले चारित्र्य असलेली व्यक्ती योग्य गोष्ट करणे निवडते कारण त्याला किंवा तिला असे करण्याचा नैतिकदृष्ट्या त्यांना अधिकार आहे असे वाटते. सिद्धांताद्वारे वर्णन केलेले पाच व्यापक व्यक्तिमत्व गुणधर्म म्हणजे बहिर्मुखता, सहमतता, मोकळेपणा, प्रामाणिकपणा आणि न्यूरोटिसिझम हे होत. आनंददायी व्यक्तिमत्व असलेला कर्मचारी असा असतो, कि जो कंपनीसाठी विविध समस्यांच्या उपायांमध्ये योगदान देतो. काय अन्यायकारक आहे, याबद्दल तक्रार करण्याऐवजी, तो किंवा ती प्रथम निर्णयामागील कारण समजून घेण्याचा प्रयत्न करतो आणि कंपनीच्या दोन्ही बाजूंना मध्यस्थी करण्याचा मार्ग शोधतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

व्यक्तिमत्व विकास तुम्हाला समाजाकडून तसेच आजूबाजूच्या लोकांकडून ओळख आणि स्वीकृती मिळविण्यात मदत करतो. व्यक्तिमत्व विकास केवळ एखाद्या व्यक्तीच्या व्यावसायिकच नव्हे तर वैयक्तिक जीवनातही महत्त्वाची भूमिका बजावतो. हे एखाद्या व्यक्तीला शिस्तबद्ध, वक्तशीर आणि त्याच्या / तिच्या जीवनासाठी एक मालमत्ता / संपत्ती बनवते. लोक त्यांचे व्यक्तिमत्त्व बदलू शकत नाहीत, जे मोठ्या प्रमाणावर स्थिर आणि वारशाने मिळालेले आहे त्यामध्येच मशगुल झालेले असतात. परंतु सतत होणारा हस्तक्षेप आणि जीवनातील प्रमुख घटनांद्वारे व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्ये बदलू शकतात.

लहान मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी पालकत्वामध्ये तीन आवश्यक घटक असतात. प्रथम, काळजी मुलांना हानीपासून वाचवते. काळजीमध्ये भावनिक तसेच शारीरिक आरोग्याचाही समावेश होतो. दुसरे म्हणजे, नियंत्रणामध्ये मुलांची आणि इतरांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सीमा निश्चित करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे क्रियाकलापांच्या सतत विस्तारित क्षेत्रांमध्ये समाविष्ट असते.



आधुनिक केसरी

## हरिनामाविना | मुक्ती नाही ||

ज्याचे त्याचे कर्म | देते त्यास फळ ||
उगा तू वाचाळ | त्रागा करी ||१||

वैतागून काय | साधशील वेड्या ||
विकारांच्या बेड्या | तोड आधी ||२||

तझी सोडवण | अन्य कोण करी ||
तुझा तूचि वैरी | आज झाला ||३||

ठायी ठायी ठाव | घेते ही विठाई ||
सत्कर्माची घाई | टाळू नको ||४||

ज्ञाना-तुका सांगे | ऐक माझ्या मना ||
हरिनामावीना | मुक्ती नाही ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी


**न मोक्षस्याकाङ्क्षा भवविभववाञ्छापि च न मे**
**न विज्ञानापेक्षा शशिमुखि सुखेच्छापि न पुनः।**
**अतस्त्वां संयाचे जननि जननं यातु मम वै**
**मृडानी रुद्राणी शिव शिव भवानीति जपतः ॥८॥**

हे चंद्रमुखी, मला मोक्षाची इच्छा नाही. जगाचे वैभव प्राप्त करण्याची अभिलाषा नाही, विज्ञानाची अपेक्षा नाही. आणि सुखाची आकांक्षा नाही. मृडानी, रुद्राणी, शिव-शिव भवानी असा नामजप करताना माझा जन्म व्यतीत व्हावा, अशी मी तुला विनंती करतो.||८||



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## || दासबोध स्तवन ||



# सृष्टीकथन

आधुनिक केसरी

नमस्कारभगवान श्रीकृष्णांनी वरील भागात साधनामार्ग दाखवला. आई जसे लहानमुलाला सांगते तसे अज्ञानी माणसाचें मन द्रुश्य जगात रमते. त्या जगातील वस्तु घेऊनच परमात्म चिंतन कसे करावे हे विभूतीरूपाने श्रीकृष्णाने दाखवून दिले आहे. जसे की वादाने वाद वाढतो त्याला अंत नाही. म्हणून चतुराने संवाद करावा व ब्रम्हनंद भोगावा. पूर्वपक्ष आणि सिध्दांत हे शास्त्राचे संकेत आहेत. त्याचा खराअर्थ साधुसंताच्या तोंडून श्रवण केलेल्या उपदेशाने नक्कीच कळतो. आपण श्रवणभक्तित याचे विस्तृत विवेचन केले आहेच. तत्वज्ञान हा तर्काचा खेळ आहे. त्यामध्ये अशी पध्दत आहे की समजा आपल्याला एक सिध्दांत मांडायचा आहे त्या सिध्दांतावर जेवढ्या शंका व आक्षेप घेता येणे शक्य आहे तेवढ्या शंका व आक्षेप आपण स्वतः च कल्पना करून काढायचे व तर्काने त्याचे निरसन करायचे. आक्षेपांना व शंकांना पूर्वपक्ष म्हणतात. व त्याच्या निरसनाला उत्तरपक्ष किंवा सिध्दांत म्हणतात. आक्षेपकाची कल्पना जितकी प्रबळ असते तितक्या शंका अधिक निघतात. सिध्दात्याला प्रत्येक शंकेचे निरसन करावे लागते ,खूपवेळा असे होते की नुसती खलनिष्पत्ती होत रहाते पण हाती काही रहात नाही. वादविवादात एकाहून एक वरचढ शंका निघतात पूर्वपक्ष व ऊत्तरपक्ष वेद शास्त्रामध्ये एवढे गुण भरलेले की त्याची शंका निष्पत्ती होऊ शकत नाही. आपले अध्यात्म शास्त्र एवढे प्रगल्भ आहे. म्हणून मित्रांनो एक सांगते वादविवाद च्या मागे लागु नका.तो सोडून संवाद साधावा. आत्मस्वरूपाचा अनुभव येतो व त्यामुळे ब्रम्हानंद प्राप्त होतो. कल्पना हे मायेचे मोठे शस्त्र आहे. माणसाला मिळालेली ही मोठी शक्ति आहे. ती योग्य वळणाने वापरली तर अगदी स्वस्वरूपापर्यन्त पोहचवते. पण तिला अयोग्य वळण लागले तर भ्रमाचे नाना प्रकार निर्माण करते. समर्थ सांगतात की देवाच्या बाबतीत माणूस अगदीं भ्रामक कल्पना करतो त्यामुळे त्याला आत्यस्वपाचे दर्शन होत नाही व परमार्थ साधत नाही.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# ज्याला समाधान तो भाग्यवान

आधुनिक केसरी

ज्याचे 'हवेपण' जास्त असते तो गरीब जाणावा, आणि ज्याचे हवेपण कमी असते तो श्रीमंत जाणावा. परमार्थी म्हणजे भिकारी असे ज्याला वाटते, त्याला श्रीमंतीची खरी कल्पनाच नाही. ज्याला नेहमी समाधान वाटते तोच खरा श्रीमंत. आमचा आधार पैशाचा; तो आज आहे अन उद्या नाही. पायाच जिथे डळमळीत तिथे इमारत कुठे पक्की होईल ? श्रीमान याचा अर्थ भगवंताशिवाय श्री असा होऊ नये, याची श्रीमंतानी काळजी घ्यावी. खरे म्हणजे समाधान हाच खरा पैसा, हीच खरी श्रीमंती, हेच खरे भाग्य, आणि हेच खरे ऐश्वर्य होय. ज्याला समाधान जास्त, तो जास्त भाग्यवान समजावा. समाधान हे आपले आपल्याला घ्यायचे असते, दुसरा कोणी ते आपल्याला देवू शकत नाही. खरोखर, समाधानासारखे औषधच नाही. ते मिळत नाही म्हणून इतर औषधे घ्यावी लागतात. काळजी नाहीशी झाली की अखंड समाधान, शांती आणि आनंद मिळतो. पैलवानासारखा दिसणारा एक गृहस्थ होता, त्याला विचारले तर तो म्हणाला, "अहो, मला मधुमेह झाला आहे; मी आतून पोखरला गेलो आहे ! त्यापेक्षा तुम्ही बरे." खरोखर, त्याचप्रमाणे पैशापासून प्राप्त होणार्‍या ऐश्वर्याची अवस्था



आहे. फक्त भगवंताच्या निष्ठेमध्ये समाधान आहे. ते राजवाड्यामध्ये नाहीच नाही, पण ते झोपडीमध्येही नसेल. असमाधान हा रोग सर्वांनाच असल्यामुळे रोगांच्या यादीतून त्याचे नावच निघून गेले आहे ! सध्या जगात पुष्कळ सुधारणा झालेल्या आहेत. पण त्यांनी माणसाला समाधान मिळालेले नाही. जीवन सुखी न होता मनाला जिच्यामुळे हुरहुर लागते ती सुधारणा कसली ? व्यक्ती काय किंवा समाज काय, यांची सुधारणा घडवून आणायला चित्त स्थिर झाले पाहिजे. चित्ताची ही स्थिरता धर्माशिवाय येणे शक्य नाही. हल्लीचे तत्वज्ञान नुसते अभ्यासी आहे, अनुभवाचे नाही; म्हणून त्याने खरे समाधान लाभणार नाही.

खरोखर, प्रत्येक जीवाला भगवंताची तळमळ लागली पाहिजे. भगवंताशिवाय जो राहतो त्याला सुखदुःख येते; आणि सुख तरी काय, दुःखाची कमतरता ते सुख ! राजापासून रंकापर्यंत प्रत्येकाला काहीतरी मिळावेसे वाटते; म्हणजे प्रत्येकाला काहीतरी कमी आहे. पण कुणी असा विचार करीत नाही की, जे आज कमी आहे ते पूर्वी आपल्याजवळ असताना तरी आपण सुखी होतो का ? याचे उत्तर 'नाही' असेच मिळते. ताजी जिलबी कल्पनेने खाण्यापेक्षा शिळ्या जिलबीचा तुकडा प्रत्यक्ष खाण्यामध्ये जास्त समाधान आहे. बुद्धिचा आनंद हा उपाधीचा आणि कल्पनेचा आनंद आहे, भगवंताचा आनंद हा उपाधीरहीत आहे. हा आनंद मिळवायला भगवंताला शरण जाऊन नामात राहणे हा एकच उपाय आहे.

**आजचे बोधवचन :** नामस्मरणाच्या योगाने आनंदाचा आणि समाधानाचा लाभ सहजी होतो यात शंकाच नाही.

**-श्रीसद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# मनाची वृत्ती बदलण्याची ताकद फक्त अखंड हरिनाम सप्ताहात : महंत रामगिरी महाराज

## कोकमठाण येथील १७५ व्या योगीराज गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहाची १० ते १२ लाख भाविकांच्या उपस्थितीत सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** मनुष्यामध्ये बदल व्हायचा असेल तर त्यांच्या मनाची वृत्तीच बदलली पाहिजे, मनोवृत्ती बदल झाला तरच खऱ्या अर्थाने समाजामध्ये एक प्रकारची शांतता, समाधान लाभेल. मनाची वृत्ती बदलण्याची ताकद फक्त अध्यात्मामध्ये व अखंड हरिनाम सप्ताहात आसल्याचे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी केले. श्री क्षेत्र सराला कोकमठाण येथील योगीराज गंगागिरी महाराज १७५ वा अखंड हरिनाम सप्ताहातील सांगतेच्या काला किर्तन गवळण बोले विरहणी या संत ज्ञानेश्वर माऊलीच्या गौळण रचनेचे विवेचन करताना महाराज पुढे म्हणाले की, आज समाजाला अध्यात्माची फार मोठी गरज आहे. गंगागिरी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहातुन अनेकांचे व्यसन नष्ट झाले स्वातंत्र्यपूर्व काळातही महाराजांनी सप्ताह अनेक अडचणी ला सामोरे जात प्रभावीपणे सप्ताह सुरू ठेवले आज समाजाची अवस्था पाहिली तर साठ टक्के समाज बिघडलेला आहे, व्यसनाधिन झाला आहे, कुठलही व्यसन विचारा अनेक व्यसनं आहेत. ज्याला वाईट व्यसनं म्हणतो ते आहेच त्याबरोबरच संपत्ती, सत्ता,संतती हे देखिल व्यसनातील प्रकार आहेत. याच्या पाठीमागेच समाज लागलेला आहे व बिघडलेला आहे. आणि म्हणून या समाजाला खऱ्या अर्थानं शांती मिळत नाही. चाळीस टक्के समाज थोडा आहे तो कुठं याच्यापेक्षा काहीतरी वेगळं मिळावं म्हणून तो विचार करतो पण तोही दिशाहिन आहे, त्याला योग्य दिशा मिळेना झालीय.



नेमकं मी काय करायला पाहिजे? माझं चांगलं वागण्याकरिता माझं जीवन स्वच्छ, जीवन सुखी होण्यासाठी काय करायला पाहिजे? असा दिशाहिन समाज झाला आहे. अध्यात्मात आल्यास भजन - किर्तन नाही आले तरी चालेल परंतु वाईट मार्गाने तरी तरुण जाणार नाही. शास्त्र हे नित्य नवीन असुन आयुर्वेदशास्त्र मानवी आरोग्यासाठी फार मोठी देणगी आहे.त्यामुळेच युवकानी व्यसनाच्या आहारी न जाता अध्यात्मिक मार्गावर चालल्यास तरुणाना चांगली दिशा मिळेल अशा दिशाहिन समाजाला योग्य दिशा देऊ कोण देत असेल तर ते फक्त अखंड हरिनाम सप्ताहाच देऊ शकतो. मनुष्य अज्ञान झाकण्यासाठी पाप करतो दुसऱ्याच्या सुखाचा नाश करतो त्याला कंस म्हणतात, दुःख रुपी विश पचवल्या शिवाय सुखाचे लोणी मिळत नाही योगीराज गंगागिरी महाराज यांनी अनेक भक्तांच्या जीवनातील दुःख दूर करून सन्मार्गावर आणले महाराजांनी पारतंत्र्यात अनेक अडचणींना सामोरे जात वेळ प्रसंगी माधुकरी मागवत कन्या घुगर्या शिजवत समाजासाठी अन्नदान सुरू ठेवले मनाची वृत्ती बदलण्याची ताकत फक्त हरिनाम सप्ताह आतच असल्याचे महाराज म्हणाले. चारशे पोते बुंदी सहाशे पोते चिवडा महाप्रसादाने १० हजार स्वयंसेवकांनी पाच मिनिटांत १० ते १२ लाख भाविकांना वाढ केली. महाप्रसादाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती जनार्दन स्वामी आश्रम कोकमठाणचे रमेश गिरी महाराज, गणेशानंद सरस्वती महाराज, माजी मंत्री बबनराव घोलप, ओडिसाच्या खासदार मंजुलाता, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, बाळासाहेब मुरकुटे, वैजापूरचे उपवानगराध्यक्ष साबेर भाई खान, भाऊसाहेब वाकचौरे, विवेक भैय्या कोल्हे, आचार्य तुषार भोसले, वंदना मुरकुटे, बाळासाहेब कापसे पाटील, नंदूशेठ संचेती, ज्ञानेश्वर टेके, बाबासाहेब जगताप, भाऊलाल सोमासे, कमलाकर कोते, विठ्ठल राव लंघे, अशोकशेठ बोर्हाडे, दत्तू खपके, सरला बेटाचे विश्वस्त ह.भ.प.मधुकर महाराज, बाळासाहेब महाराज रंजाळे, संदिपान महाराज, यांच्यासह सरला बेट संस्थांवरील महाराज मंडळींची उपस्थिती होती.

**पुढील वर्षीचा योगीराज सद्गुरु गंगागिरी महाराज यांचा 176 वा सप्ताह आपल्यालाच मिळावा यासाठी वैजापूर तालुक्याच्या वतीने आमदार रमेश बोरनारे, साबेरभाई खान, बाळासाहेब संचेती, गंगापुरच्या वतीने माजी अर्थ बांधकाम सभापती संतोष पा. जाधव, नेवासा माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, नागेबाबा पतसंस्थेचे कडुभाऊ काळे आदी विविध ठिकाणच्या 15 ते 20 भाविकांनी मागणी यावेळी केली.**



## नादांतांडा येथे जि.प. शाळेची रॅली व सामूहिक राष्ट्रगान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नादांतांडा येथे ग्रामपंचायत अंतर्गत जि.प.शाळेच्या शिक्षक कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांची रॅली नादांतांडा व नादागांवातून काढून "हर घर तिरंगा" येत्या १३ व १५ ऑगस्ट या कालावधीत प्रत्येक घराघरात तिरंगा फडकवणारा उपक्रम नादांतांडा सरपंच मोरसिंग दगडू चव्हाण, उपसरपंच देवकाबाई राठोड व ग्रामसेवक प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली "हर घर तिरंगा" ही मोहीम विद्यार्थ्यांची रॅली काढून जनजागृती केली व क्रांतिदिनी स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त गावातून रॅली काढून विद्यार्थ्यांनी जि.प.मराठी शालेच्या प्रांगणात एकत्रितपणे सामूहिक राष्ट्रगान गायिले.

अनेक मराठी, इंग्रजी, शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यावेळी घर घर तिरंगा, हर घर तिरंगा या अभियान अंतर्गत गृप ग्रामपंचायत नादागांव व नादांतांडाच्या वतीने राष्ट्रीय तिरंगा ध्वज ग्रामपंचायत, पोष्ट ऑफिसमधे ग्रामस्थांना मिळणार आहे, असल्याची माहिती सरपंच मोरसिंग चव्हाण यांनी दिली. दि.१३ ते १५ ऑगस्ट हे तीन दिवस घर घर तिरंगा हर घर तिरंगा अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानात नागरिकांनी सहभाग नोंदवून तिरंगा ध्वज आपल्या घरावर लावावा असे आवाहन वरदानसिंग चव्हाण यांनी केले. देशाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र यावे असे प्रतिपादन उपस्थित शिक्षक कर्मचारी व मान्यवरांनी केले. विद्यार्थ्यांनी विविध घोषणा देत भारतीय स्वातंत्र्याचे महत्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण, सरपंच मोरसिंग चव्हाण, उपसरपंच देवकाबाई राठोड, नितीन पाटील, प्रविण पाटील, अवतार चव्हाण, ग्रा. पं. सदस्य वरदानसिंग चव्हाण, सुमनबाई चव्हाण, शोभाताई राठोड, प्रकाश राठोड, रोहीदास राठोड, लताबाई चव्हाण, ग्रा.पं.चे कर्मचारी, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशा प्रकारे तिरंगा रेली व सामूहिक राष्ट्रगान कार्यक्रम शाळेत संपन्न झाला.

## सावळदबारा येथे जागतिक अदिवासी दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे परिसरात विविध ठिकाणी दि.९/८/२२ मंगळवार रोजी जागतिक अदिवासी दिन म्हणून संपूर्ण विश्वात साजरा केला जातो. या दिवसाच्या औचित्याने सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात वेगवेगळ्या ठिकाणावरून आपल्या आदिवासी समाजाला जागतिक आदिवासी दिनाचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्राचे आराध्य दैवत मानले जाणारे छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अदिवासी दिनाच्या निमित्ताने भगवान क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत यांच्या प्रतिमेला माजी ग्रा.प.सदस्य फकीरा तडवी यांनी पुष्पहार अर्पण व पुजा करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी भागवत गायकवाड यांनी थोडक्यात माहिती दिली. जागतिक आदिवासी दिन,विश्वात आदिवासी दिवश मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो आदिवासी हा शब्द आदी + वाशी आशा दोन शब्दांनी बनलेला आहे. या जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने थोडक्यात माहिती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जागतिक अदिवासी दिन.. न्याय हक्कांसाठी, अन्याय, अत्याचाराविरुद्ध जल, जंगल, संपत्तीसाठी लढा देण्यासाठी भगवान बिरसा मुंडा समाजकार्य यासाठी नेहमी झटत राहले. अशा प्रकारे विविध ठिकाणी जागतिक अदिवासी दिन जि.प.शाळा, ग्रामपंचायत कार्यालय, श्रीयांशी क्लासेस, शिवाजी विद्दालयात जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला.

तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.जीवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते) यांनी केले. यावेळी सरपंच स्वातीताई भाऊराव पाटील, उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान, माजी ग्रा.प.स.फकीरा तडवी, परवेश तडवी, मुख्याध्यापक एम.डी.सोनवणे, विद्दा सरकटे, निता हिरास, गजानन गवई, ढोणे, ग्रामसेवक सुधीर भालेराव, संजय नप्ते, परवेश तडवी, ईसा तडवी, मनोर तडवी, रज्जू तडवी, मजीत तडवी, कादर तडवी, गफ्फार तडवी, जब्बार तडवी, जावेद तडवी, शिक्षकवर्ग, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.





कन्नड तालुक्यातील पिशोर पोलीस ठाण्याचे किरण गंडे व गणेश चेळेकर यांची पोलीस हवालदारपदी बढती झाली असून पिशोर पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक कोमल शिंदे व उपनिरीक्षक सतिष बडे यांनी सोनेरी फित लावुन सन्मान केला. यावेळी पिशोर पोलीस ठाण्याचे सर्व सहकारी उपस्थित होते.




## हिंगोली जिल्ह्यात मुसळधार

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** राज्यभरात मागील तीन दिवसांपासून पावसाने सपाटा लावला आहे. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून सतत पडणाऱ्या पावसामुळे शेतातील कामेदेखील ठप्प झाली आहेत. मागील दोन ते तीन दिवसांपासून इसापूर धरण परिसर व पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे धरणात आवक वाढली आहे. परिसरातील पाऊस आणि वाढलेली आवक यामुळे इसापूर धरणातून विसर्ग करण्यात येत आहे. आज सकाळी ११ वाजता धरणाची २, १४, ८, ७, ९, ६, १०, ५, ११, ४, १२ क्रमांकाचे दरवाजे १ मीटरने दरवाजा क्रमांक ३ व १३ हे दोन दरवाजे ५० सेमीने उघडण्यात आले आहेत.

कितीही ज्ञान असले तरी बोलता आले पाहिजे
जालना शहरात
भाषणकलेची कार्यशाळा
दर रविवारी २ तास, प्रत्यक्ष सरावातून प्रशिक्षण
* व्हाट्सप संपर्क *
विनोद जैतमहाल
9823028332
SPEAKER'S ACADEMY
भाषणकलेची कार्यशाळा
Changing lives since 2016

# राष्ट्रकुलमध्ये कमाई

आधुनिक केसरी

इंग्लंडमधील बर्मिंगहॅम शहरातील अलेक्झांडर स्टेडियमवर २२वी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा खेळवली गेली. यावर्षीच्या राष्ट्रकुल स्पर्धेत भारताने एकूण ६१ पदके जिंकून पदकतालिकेत चौथे स्थान मिळवले. यामध्ये २२ सुवर्ण, १६ रौप्य आणि २३ कांस्य पदकांचा समावेश आहे. टोकियो ऑलिंपिकमधील यशानंतर भारतीय खेळाडूंनी राष्ट्रकुल स्पर्धेतही आपल्या देशाचा गौरव वाढवला. टोकियो ऑलिंपिकमध्ये भारताने सात पदकांची कमाई केली होती. त्यामुळे साहजिकच राष्ट्रकुल स्पर्धेत अपेक्षा वाढलेल्या होत्या. मात्र, नेमबाजीची अनुपस्थिती भारताला संकटात टाकेल की काय? अशीही धाकधूक क्रीडा प्रेमींच्या मनात होती. २०१८मध्ये झालेल्या गोल्ड कोस्ट राष्ट्रकुल स्पर्धेत नेमबाजीमध्ये भारताने १६ पदकांची कमाई केली होती. याशिवाय, तारांकित भालाफेकपटू नीरज चोप्रा हा उद्घाटन सोहळ्याच्या दोन दिवस आधी मांडीच्या दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर पडला. त्यामुळे भारतात या खेळांसाठीचा उत्साह किंचितसा कमी झाला होता. मात्र, इतर खेळाडूंनी कशाचीही पर्वा न करता आपल्या सर्वोत्तम खेळ दाखवण्याचा प्रयत्न केला आणि आपल्या लौकिकाला साजेशी अशी पदकांची कमाई केली. ॲथलेटिक्समध्ये यावर्षी भारतीय खेळाडूंनी जीवतोड मेहनत केल्याचे दिसले. तेजस्वीन शंकरने भारताला ॲथलेटिक्समध्ये पहिले पदक मिळवून दिले. खेळापूर्वी त्याला सहन कराव्या लागलेल्या सर्व त्रासांनंतर त्याच्या कांस्यपदकाला सोन्याइतकेच महत्त्व होते. मुरली श्रीशंकरने लांब उडी स्पर्धेत रौप्यपदक जिंकून चांगली कामगिरी केली. चालण्याच्या शर्यतीमध्ये प्रियंका गोस्वामीने रुपेरी कामगिरी केली. तिहेरी उडीमध्ये एल्डोस पॉल आणि अब्दुल्ला अबूबकर या दोन खेळाडूंनी अभूतपूर्व कामगिरी करून सुवर्ण आणि रौप्यपदक मिळवले. मात्र, सर्वात जास्त चर्चा झाली ती महाराष्ट्रीय खेळाडू अविनाश साबळे याची. त्याने अडथळ्यांच्या (स्टीपलचेस) शर्यतीत रौप्य पदक पटकावून केनियन खेळाडूंची मक्तेदारी मोडून काढण्याची कामगिरी केली. भारतीय कुस्तीपटूंनी तर कमलाच केली. बर्मिंगहॅमला गेलेल्या सर्व १२ कुस्तीपटूंनी पदके जिंकली आहेत. रवी दहिया, बजरंग पुनिया, दीपक पुनिया, विनेश फोगट, नवीन सिहाग आणि साक्षी मलिकने सुवर्ण, तर अंशू मलिकने रौप्यपदक जिंकले. पूजा गेहलोत, पूजा सिहाग, दीपक नेहरा, दिव्या काकरन आणि मोहित ग्रेवाल हे कांस्यपदकांचे मानकरी ठरले. बॉक्सिंग चमूनेही कंबर कसत पदकांची लयलटू केली. नितू घांगघस, अमित पंघाल आणि निखत जरीन यांनी प्रतिस्पर्ध्यांना घाम फोडून सोने मिळवले. सागर अहलावतला बॉक्सिंगमध्ये चौथ्या सुवर्णपदकाची भर घालता आली नाही. त्याला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. मोहम्मद हुसामुद्दीन, जैस्मिन लॅम्बोरिया आणि रोहित टोकस यांनी कांस्यपदक मिळवले. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा शेवटचा दिवस भारताच्या बॅडमिंटनपटूंनी गाजवला. पीव्ही सिंधूने महिला एकेरीच्या अंतिम फेरीत सुवर्णपदक पटकावले. डाव्या घोट्याला दुखापत असूनही केवळ ४८ मिनिटांत सरळ गेममध्ये तिने विजय मिळवला. त्यानंतर आपली पहिलीच राष्ट्रकुल स्पर्धा खेळत असलेल्या लक्ष्य सेनने मलेशियाच्या प्रतिस्पर्ध्यावर खणखणीत विजय मिळवत देशाला आणखी एक सुवर्ण मिळवून दिले. दिवसाच्या अखेरीस सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी पुरुष दुहेरीत बॅडमिंटनमधील तिसरे सुवर्णपदक मिळवून दिले. वरील सर्व खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे भारताला पदक तालिकेमध्ये चौथे स्थान मिळवणे शक्य झाले. गुणवत्तेचा आणि कौशल्यांचा विचार केला तर भारतीय खेळाडूंनी कमालीची प्रगती केली आहे. त्यामुळे साहजिकच खेळाडूंचा आत्मविश्वासही वाढलेला दिसला. याच आत्मविश्वासासह हे खेळाडू आता ऑस्ट्रेलियामध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल स्पर्धेत उतरतील.

# शिक्षक पात्रता परीक्षा गौडबंगाल...




प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

शिक्षणामुळे माणूस सुसंस्कृत होतो. शिक्षण हे मानवी जीवनाच्या विकासाचा पाया आहे. त्यातल्या त्यात तर शिक्षक हा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणारा अत्यंत महत्त्वाचा घटक असून तो समाजाचा शिल्पकारही असतो. आशा या शिक्षकाच्या संदर्भातील टीईटी परीक्षेच्या घोटाळा संदर्भातील बातमी ऐकल्यानंतर,पाहिल्यानंतर देशातील सामान्य जनतेचे आणि गोरगरीब विद्यार्थ्यांचे भवितव्य काय? हा प्रश्न मनात सलत राहतो. ज्यांच्या शिक्षण संस्था आहेत त्यांनी मात्र बहुतांशी आपले नातेवाईक, पैसे देणारे, आपल्याच भागातील उमेदवार अशांनाच संधी दिली जात आहे. गुणवत्ता असणारे विद्यार्थी मात्र दळणातल्या खड्यासारखे बाजूला फेकले जात आहेत.

दोन दिवसापासून अब्दुल सत्तार यांच्या मुलीच्या टीईटी परीक्षा बाबतची बातमी सर्व माध्यमावर झळकली. त्याची चौकशी व्हावी असे स्वतः अब्दुल सत्तार जरी म्हणत असतील तरी जाळ असल्याशिवाय धूर निघणे शक्य नाही. आता तर त्यांना मंत्रीपदाची शपथ देऊन खोट्यांनाच न्याय मिळतो आहे हे दाखवून दिले आहे. खरे तर राजकारण आणि राजकारणातील व्यक्ती किती सामान्य जनतेला फसवण्याचा प्रयत्न करताना दिसतात हे या प्रकरणावरून लक्षात यायला लागते. अब्दुल सत्तार मात्र निमित्त आहेत. राजकारणातील आमदार, खासदार, मंत्री व ग्रामपंचायत शिपाई, सदस्य असो तो सामान्य जनतेची गळचेपी आणि लुटमारच करताना दिसतो. हे भयंकर वास्तव नाकारता येण्यासारखे नाही. ते कितीही सामान्य जनतेच्या कळवळ्याविषयी किंवा पारदर्शकतेविषयी गप्पा मारत असतील तर ते एकदम खोटारडेपणाचे आहे.जसे ते बोलतात तसे कधीच वागताना दिसत नाहीत. जनता भोळी भाबडी आहे, अंधभक्त आहे, अडाणी आहे, राजकारण न समजणारी आहे म्हणूनच हे जनतेची दिशाभूल आणि फसवणूक करताना दिसतात. आज गल्लीपासून दिल्लीपर्यंत सगळेच क्षेत्र हे उकिरड्यासारखे झाले आहेत. कितीही स्वच्छ भारतचा आव आणला तरी तो केवळ फक्त बोलण्यापुरताच आहे. देश रसातळाला जात आहे, महागाईने सामान्य जनतेचे कंबरडे मोडले आहे. जीवन जगणे मुश्किल झाले आहे. हुकूमशाही प्रवृत्ती बळावत आहे. लोकशाहीची गळजेपी केली जात आहे. तरीही देशातील कुठल्याच सरकारला व लोकप्रतिनिधींना त्याचे गांभीर्य नाही. खरे तर हे लोकप्रतिनिधी कायद्याने वागताना दिसत नाहीत. शिक्षणामुळे माणूस सुसंस्कृत होतो. शिक्षण हे मानवी जीवनाच्या विकासाचा पाया आहे. त्यातल्या त्यात तर शिक्षक हा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणारा अत्यंत महत्त्वाचा घटक असून तो समाजाचा शिल्पकारही असतो. आशा या शिक्षकाच्या संदर्भातील टीईटी परीक्षेच्या घोटाळा संदर्भातील बातमी ऐकल्यानंतर,पाहिल्यानंतर देशातील सामान्य जनतेचे आणि गोरगरीब विद्यार्थ्यांचे भवितव्य काय? हा प्रश्न मनात सलत राहतो. ज्यांच्या शिक्षण संस्था आहेत त्यांनी मात्र बहुतांशी आपले नातेवाईक, पैसे देणारे, आपल्याच भागातील उमेदवार अशांनाच संधी दिली जात आहे. गुणवत्ता असणारे विद्यार्थी मात्र दळणातल्या खड्यासारखे बाजूला फेकले जात आहेत. अनेक शिक्षण संस्थेत असे काळे बेळे प्रकरणं आहेत पण ते अशा आमदार खासदार मंत्र्यांमुळे ते दडपून टाकले जातत. शिक्षण विस्तार अधिकारी, शिक्षणाधिकारी, शिक्षण संचालक, शिक्षण सहसंचालक, विद्यापीठे व शिक्षण खात्याच्या संदर्भातील मंत्रीही यामध्ये सहभागी असतात असे म्हणायला हरकत नाही. कारण या संदर्भातली कुणी ना कुणीतरी तक्रार करत असतोच परंतु ही तक्रारही अत्यंत चपलाखीने खालपासून वरपर्यंत दाबून टाकली जाते व उलट तक्रार करणा-यालाच त्रास दिला जातो हे वास्तव आहे.जे दीन आहेत, गरीब आहेत, ज्यांचे आई-वडील शेती विकून, मोलमजुरी करून विद्यार्थ्यांना शिकवतात. शहरात ठेवतात. आपल्याला कुठेतरी चार घास सुखाचे खायला मिळावेत, आपल्या मुलाचं भलं व्हावं हे स्वप्न घेऊन कष्ट असतात. जगत असतात. त्यांच्या या स्वप्नावर नांगर फिरविण्याचे काम अशा प्रकारचे संस्थाचालक, लोकप्रतिनिधी, अधिकारी व मंत्री करत असतील तर किती लाजिरवाणी गोष्ट आहे. आज जो दुसऱ्यांचा छळ करतो, जो दुसऱ्याला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करतो, जो जास्तीत जास्त भ्रष्टाचार करतो, जो खुनी आहे, लबाड आहे अशांनाच राजकारणात मानाचे स्थान दिले जात आहे. त्यांनाच मंत्री केले जाते निवडून दिले जाते. हे वाईट आहे. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये संस्काराचे, नीतिमत्तेचे, जीवन मूल्याचे राजकारण राहिलेले नाही हे दिसून येत आहे. सामान्य जनतेने आता जागृत होणे गरजेचे आहे. पैशावाल्यांचीच मुले पुढे येत




असतील, त्यांना नोकऱ्या मिळत असतील तर खेड्यातील शेतकरी, शेतमजूर,दीन, दलित, गरीब व आदिवासी पाड्यावरील विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे काय? गुणवत्तेचे काय? दर्जेदार शिक्षणाचे काय? शिक्षण क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केला जातो. अनेक खोट्या जागा भरल्या जातात. पदोन्नतीच्या वेळी शिक्षकाकडून खूप पैसे उकळले जातात. ते वरपर्यंत द्यावे लागतात असेही दबक्या आवाजात म्हटले जाते. खरे तर शिक्षण हे समाज सुधारण्याचे प्रवेशद्वार आहे असे म्हटले जाते. परंतु आजच्या विद्यार्थ्याला अंगणवाडी पासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत दर्जेदार शिक्षण मिळत नाही. शासनाने अनेक योजना बंद केलेल्या आहेत. संस्था चालक राजकीय असल्यामुळे तिथले वातावरणही गढूळ झाले आहे. त्यामुळे शिक्षणाचे तीन तेरा केव्हाच वाजलेले दिसून येतात. आज विद्यार्थ्यांना साधा अर्जही लिहिता येत नाही ही भयंकर परिस्थिती नाकारता येणार नाही. आजच्या व्हाट्सअप, फेसबुक व इंटरनेटच्या जमान्यात विद्यार्थीही सामाजिक बांधिलकीपासून, सदाचरणापासून व शिस्तीपासून कोसो दूर जाताना दिसतो आहे. याचाच फायदा राजकीय क्षेत्रातील लोकप्रतिनिधी त्यांना आपल्याकडे खेचून घेण्यात यशस्वी होताना दिसत आहेत. आजचा विद्यार्थी समाजाची, राजकारणाची, शिक्षणाची, सांस्कृतिक क्षेत्राची कुठलीच समीक्षा करू शकत नाही. चुकणाऱ्यांना प्रश्न विचारू शकत नाही. इथल्या या व्यवस्थेला नेमकं तेच करायचं आहे. लोकप्रतिनिधींनाही त्यांचा उद्देश त्यांना सफल करून घ्यायचा आहे त्यामुळेच असा गोंधळ माजवला जातो आहे. असा भ्रष्टाचार सगळ्याच क्षेत्रात सगळेच पक्ष करताना दिसत आहेत. कुणी कितीही धुतल्या तांदळाचा आव आणला त्याला काही अर्थ नाही. महाराष्ट्राचे राजकारण, लोकप्रतिनिधी तर किती खालच्या पातळीवर गेलेले आहे हे आपण रोज टीव्हीवर पाहतो आहोत. ते किती निर्लजपणाने वागतात आणि खोटे बोलतात हेही आपण पाहतो आहोत. खरे तर ते समाजाला लागलेली कीड आहे आणि ती कीड संपूर्ण समाज पोखरून टाकत आहे. समाज व्यवस्था नष्ट करून पाहते आहे. आज देशात महागाई प्रचंड वाढली आहे. बेरोजगारी आहे. लोकांना नोकऱ्या नाहीत. खाजगीकरण होत आहे. शिक्षणाचा दर्जा घसरला जात आहे. शेतकरी आत्महत्या करत आहेत. स्त्री असुरक्षित आहे.याच्या विरोधात मात्र कुठलेच लोकप्रतिनिधी आवाज उठवताना दिसत नाहीत. त्यांनाच मंत्रीपद कसे मिळेल ते स्वतःच कसे मोठे होतील याकडेच त्यांचे लक्ष आहे. सामान्य जनतेचे त्यांना काही देणे घेणे राहत नाही. मुहॅ हे राम बगल मे छुरी अशी त्यांची वर्तणूक दिसते आहे. त्यामुळे सामान्य जनतेने, तरुणाने वेळीच सावरून अशांना धडा शिकवणे हे फार महत्त्वाचे आहे.

# अज्ञानाचा समूळ नाश होईल एवढे ज्ञान जीवनावश्यक...!



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

आपल्या जीवनातील अज्ञानरूपी जळमटं दुर करण ही काळाची गरज असते. गर्द अशा काळोखाच्या रात्री येणाऱ्या अंधाराचा समूळ नाश झाल्यानंतरच भव्य-दिव्य अशा नव्या किरणांची सकाळ होऊन स्वच्छ असा सुर्यप्रकाश दिसतो. तसेच सूर्याच्या मध्ये येणारा ढग बाजूला झाल्यानंतरच आपल्याला सुर्याच अप्रतिम तेज दिसते. याच प्रमाणे अज्ञानाचा समुळ नायनाट झाल्याखेरीज किंवा अज्ञान हे मुळासकट संपुष्टात आल्याखेरीज व्यवस्थित जीवनाचा मार्ग दिसत नाही. म्हणून मुख्यत्वे ज्ञान म्हणजे काय हा जरी विशालकाय प्रश्न असला तरी प्रत्येक व्यक्ती परत्वे ज्ञानावरील मते ही वेगवेगळी असतात. तस असणं ही स्वाभाविक -नैसर्गिक आहे. कारण ज्ञानाची असी निश्चित व्याख्या करता येत नाही.

ज्ञान समुद्रातील एक प्याला. ज्ञान मिळविण्यासाठी कित्येक जन्म अपुरे पडतील. ज्ञान आणि जीवनाची गरज पाहता वेगवेगळ्या प्रकारच्या ज्ञानापैकी अज्ञानाच्या समुद्रातील नौका पैलतीरावर घेऊन जाईल एवढं ज्ञान तर प्रत्येकाला जीवनावश्यक आहेच. म्हणुन प्रत्येकाच्या जीवनातील ज्ञानाची गरज ही वेगवेगळी असु शकते. व्यक्तीपर्तवे ही गरज आणि मर्यादा बदलते. ज्ञानाची उपलब्धता पाहता व्यवस्थित जीवन व्यतित करण्यासाठी अज्ञानाचा समुळ नाश होईल एवढं ज्ञान पुरेसं असु शकतं. सर्वसाधारण जीवनात किती ज्ञान अपेक्षित आहे. तसं पाहिलं तर आपण आयुष्यभर ज्ञान अर्जित केले तरी ज्ञान संपणार नाही. एवढी ज्ञानाची प्रचंड मोठी व्याप्ती आहे. ज्ञान हे अमर्याद असतं. जसा समुद्र विशालकाय तसंच ज्ञान पण विशालकाय. किती ही मिळवलं तरी पुर्ण होऊ शकत नाही. एवढी ज्ञानाची अमर्याद अवस्था आहे. परंतु जीवनाच्या रंगमंचावर अज्ञानाचा समुळ नाश होईल एवढं ज्ञान मिळाल तरी पुरेसं आहे. ज्ञानी होण्यासाठी फार काही करण्याची आवश्यकता नसते. ज्ञान आणि अज्ञान यातील फरक समजला म्हणजेच अज्ञानाला समुळ नष्ट करता येईल एवढं माफक ज्ञान असल तरी पुरेसं आहे. आपल्या जीवनातील अज्ञानरूपी जळमटं दुर करण ही काळाची गरज असते. गर्द अशा काळोखाच्या रात्री येणाऱ्या अंधाराचा समूळ नाश झाल्यानंतरच भव्य-दिव्य अशा नव्या किरणांची सकाळ होऊन स्वच्छ असा सुर्यप्रकाश दिसतो. तसेच सूर्याच्या मध्ये येणारा ढग बाजूला झाल्यानंतरच आपल्याला सुर्याच अप्रतिम तेज दिसते. याच प्रमाणे अज्ञानाचा समुळ नायनाट झाल्याखेरीज किंवा अज्ञान हे मुळासकट संपुष्टात आल्याखेरीज व्यवस्थित जीवनाचा मार्ग दिसत नाही. म्हणून मुख्यत्वे ज्ञान म्हणजे काय हा जरी विशालकाय प्रश्न असला तरी प्रत्येक व्यक्ती परत्वे ज्ञानावरील मते ही वेगवेगळी असतात. तस असणं ही स्वाभाविक -नैसर्गिक आहे. कारण ज्ञानाची असी निश्चित व्याख्या करता येत नाही. ज्ञान हे अमर्याद आहे. जसं समुद्राची लांबी-रुंदी आणि खोली मोजता येत नाही. तसेच जस सुर्याचे तेजही मोजता येत नाही. तसंच ज्ञानाच आहे. ज्ञान हे अमर्याद स्वरूपात आहे. कारण ज्ञान हे जीवनाच्या रंगमंचावर जीवनारुपी नावेतुन पैलतीरावर जात असताना जो अज्ञानरूपी अंधकार-भ्रम-वादळं निर्माण होत आणि या वादळाने, अज्ञानाने जीवनात अनेक प्रिय-अप्रिय घटना-घडामोडी घडत असतात किंवा अशा घटनांना आपल्याला सामोरे जावे लागत असते. मुळात जीवनाला अस्थिर करणार हे अज्ञान समुळ नष्ट होण म्हणजेच ज्ञान सत्याचा बोध होणं व सत्य स्वीकारण म्हणजे ज्ञान. मुख्यत्वे अज्ञानाचे दोन प्रकार आहेत. त्यातील एक म्हणजे व्यक्तिगत अज्ञान ज्यामध्ये सत्त्यापासून दुर जाण. तसेच अनेक भ्रम निर्माण होऊन जीवन दुःखाच्या चक्रव्यूहात आडकण म्हणजे अज्ञान, भ्रमाचा मृगजळ भासण व दिसण म्हणजे अज्ञान, सद्सदविवेक जागृत नसणं म्हणजे अज्ञान, दुःखाच्या छायेत जाण म्हणजे अज्ञान, शाश्वत आणि भौतिक यामधील अंतर न कळण म्हणजे अज्ञान, एकंदरीत जीवनाच्या वाटेवर नको असलेल्याला किंवा यशस्वी जीवनासाठी हानिकारक बाबींच गाठोड ओझ घेऊन फिरणं म्हणजे अज्ञान आणि या ओझ्याखाली आपण एवढं डुबतो की, पुन्हा उभा राहण्याची ताकद-शक्ती राहत नाही. हे असणार अज्ञान आणि या अज्ञानाचा समुळ नायनाट करता येण म्हणजेच ज्ञान. तसच दुसरा प्रकार म्हणजे सामाजिक स्तरावरील अज्ञान. ज्या सामाजिक अज्ञान, रूढी परंपरा, धार्मिक अज्ञान, व्यवहारातील अज्ञान, नातेसंबंधातील अज्ञान म्हणजे पृथ्वीवरील प्रत्येक बाबी मध्ये ज्ञान आणि अज्ञान अशा दोन बाबी सामावलेल्या आहेत . त्यापैकी एक बाजू म्हणजे अज्ञान ती समुळ नष्ट होण किंवा ती आपल्याला न जाणवण-दिसण म्हणजेच ज्ञान. पण हे ज्ञान एवढं सहज उपलब्ध आहे का....?? तर होय हे अज्ञान समुळ नष्ट होण फार अवघड गोष्ट नाही किंवा अशक्य प्रायः ही नाही. म्हणून जीवनात आपल्या मन बुद्धी वर अज्ञान प्रभावित होणार नाही एवढं ज्ञान सर्वसामान्य माणसाला माफक पुरेस आहे.

आणि आध्यत्मिक साहित्या मधुन हे ज्ञान सहजपणे मिळेल एवढं आध्यत्मिक साहित्य महाराष्ट्र राज्यातील संत-मंहतानी निर्माण केले आहे. हे आपलं परमभाग्य पण आपण याकडे डोळेझाक करतो हे आपलं दुर्भाग्य....!!

म्हणून अज्ञानाचा समुळ नायनाट करून योग्य अशा ज्ञाना मार्गावर चालण हे प्रत्येक जीवांसाठी हितकारक आहे.......!!!!!.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# बहिणीने भावासाठी आणली लक्ष्मीची पावलं...

आधुनिक केसरी

**विश्वासला एका मागोमाग घडत गेलेल्या घटनांची संगती लागली. निरगुडकरने दोन हजारच्या दहा कोऱ्या नोटा दिल्या होत्या. पूर्णिमेने दिलेल्या पाकिटातही दोन हजाराच्या दहा कोऱ्या नोटा होत्या. सगळं रहस्य स्पष्टपणे उलगडलं. विश्वास भावनाविवश होत म्हणाला, "सुनंदा, मला आज दत्ता हलसगीकरांच्या कवितेच्या ओळी आठवतात. आभाळाएवढी ज्यांची उंची त्यांनी थोडेसे खाली यावे...मातीत ज्यांचे जन्म मळले, त्यांना उचलून वरती घ्यावे...! माझ्या बहिणीने त्या ओळी सार्थ केल्या आहेत. ती काही दिवसासाठीच आली आणि जाता जाता आपल्या भावाच्या घरात लक्ष्मीची पावलं उमटवून गेली.**

व्यंकटेश देवन पल्ली

पूर्णिमा ऑफिसमधून निघतच होती, तितक्यात साहेबांनी बोलावल्याचा निरोप आला. केबिनमधे शिरताच साहेबांनी तिला एक लिफाफा दिला. तिनं तिथंच उघडून पाहिलं. पुण्याच्या एनआयबीएममधे एका आठवड्याच्या इन्फ्रास्ट्रक्टर फायनान्सिंगच्या ट्रेनिंगसाठी तिचं नॉमिनेशन होतं. दिल्लीतल्या मोठ्या फायनान्शियल सर्व्हिसेस कंपनीत एक कार्यक्षम अधिकारी म्हणून तिची चांगलीच ख्याती होती. तिने सस्मित मुद्रेने साहेबांना 'थॅंक्स' सांगितलं. साहेब फायलीत गुंतले होते. तिनं अदबीने विचारलं, "सर, इफ यू डोंट माईंड...ट्रेनिंगनंतर मला तीन दिवसांची सुटी हवीय. माझं माहेर पुण्याचं आहे..." पहिल्यांदाच मान वर करून साहेब म्हणाले, "ओके, मॅम. फ्लाईटची तिकीटं त्याप्रमाणे बुक करायला सांगा."

"थॅंक्यू सर" म्हणून ती बाहेर पडली. पाच वर्षापूर्वी बाबा गेल्यानंतर, ती एकदाही पुण्याकडे फिरकली नव्हती. हे ट्रेनिंग आलं नसतं तर, तो कधी योग आला असता ते देवच जाणे. दरवेळी पुण्याला जायचं म्हटलं की नवरोबा प्रदीप काहीतरी विघ्नच उभं करायचा. 'आता काय आहे पुण्यात? तुझे आईबाबा तर या जगातच नाहीत. तुझ्या भावाकडे काय आहे म्हणून जातेस?' असं वाट्टेल ते बडबडायचा.

'यावेळी पुण्याला जाताना हा कसले विघ्न आणतो, तेच बघू या,' असं मनातल्या मनात म्हणत ती घरी आली.

ट्रेनिंगच्याविषयी प्रदीपला एक दोन दिवस आधी सांगावं हेच बरं, असं तिनं पक्कं ठरवलं.

शुक्रवारी रात्रीची जेवणं झाल्यानंतर तिनं सांगितलं, "प्रदीप, या सोमवारपासून दहा दिवसासाठी बाहेर जातेय. मला इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्सिंगचं ट्रेनिंग आलंय."

"अरे व्वा! अवश्य जा. मुंबईला ना?" तिने थंडपणे "एनआयबीएम, पुणे" असं सांगितलं. "हरकत नाही. तिथे रेसिडेन्शियल फॅसिलीटी आहे. तिथंच राहा म्हणजे झालं." तो म्हणाला. तिने प्रतिक्रिया दिली नाही. त्याच्या प्रत्येक वाक्यात जनरल मॅनेजर असल्याचा त्याचा दर्प प्रकट व्हायचा. ज्या घरच्या लोकांनी याला जीवनसाथी म्हणून कन्या प्रदान केली, त्या लोकांविषयी याला इतका तिटकारा कशासाठी वाटावा? हे तिला न पडलेलं कोडं होतं.

ती ते कोडं सोडवायच्या भानगडीत पडली नाही. एकुलता एक आज्ञाधारक मुलगा अथर्व बारा वर्षाचा आहे. एक मुलगी असती तर, कन्येची काय माया असते हे समजलं असतं, असं तिला उगाचच वाटून जायचं. पण देव थोडंच सगळ्यांना कन्यारत्न देतो?

शनिवारी संध्याकाळी फ्लाईटने निघाली आणि सहाच्या सुमारास पुण्यात येऊन पोहोचली. बेल वाजवताच, दार उघडायला सुनंदा वहिनीच आली. पूर्णिमाला अचानक दारात बघून ती दिग्मूढ झाली. नकळत तिच्या डोळ्यांत पाणी तरळलं. "हे काय वन्सं, अगदी अचानक? एखादा फोन तरी करायचास. किती दिवसांनी..." असं म्हणत तिने पाणावल्या डोळ्यांने मिठी मारली. पूर्णिमा तिच्या कानात हळूच कुजबुजली, "सीबीआयचे लोक धाड मारायच्या आधी फोन करतात का कधी? वहिनी, काय अवस्था करून घेतलीयस तू?" इतका वेळ लांब उभी असलेली शर्वरी धावत आली आणि आत्याला बिलगली. ती बरीच उंच झाली होती. पूर्णिमेने ठसक्यात सांगितलं, "वहिनी, मी तुझ्याकडे दहा दिवस राहणार आहे. तुझ्या हातचं चांगलंचुंगलं खायला. आणि तुला छळायलाही. राहू ना? सकाळचा ब्रेकफास्ट आणि दुपारचं जेवण ट्रेनिंग कॉलेजमध्ये असणार आहे. मी तुला माझ्या रात्रीच्या जेवणाची संधी देते." असं म्हणत पूर्णिमेने जुनंपुराणं फ्रिज उघडलं. दुधाचं भांडं सोडून जवळपास ते रिकामंच होतं. "काय आहे नं, वन्सं, कालच फ्रिजची साफसफाई केली. फार दिवसापासून राहिलं होतं." सुनंदाने सावरण्याचा प्रयत्न केला. "वहिनी, मी फ्रेश होऊन येते. मला बाहेर जायचंय. आधी मस्तपैकी चहा कर.


रात्री तुझ्या हातची कढी खिचडी खायची आहे. करशील ना?" सुनंदाने मान डोलावली.

फ्रेश होऊन चहा घेतल्यानंतर, ती थेट भावाच्या दुकानावर पोहोचली. तिला पाहताच विश्वासला त्याच्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. "पुन्नु, तू आज अचानक पुण्यात कशी?"

"अरे मी इकडे ट्रेनिंगला आलेय. कंपनीच्या ऑफिसची कार होती. म्हटलं, जाताजाता दुकानात चक्कर टाकावी. दादा काय हे? पुढच्या पंधरवड्यात शाळा सुरू होणार आहेत ना? आपलं दुकान तर सगळं रिकामंच दिसतंय." पूर्णिमानं असं म्हटल्यावर, विश्वास क्षणभर स्तब्ध झाला. नंतर केविलवाणं हसू आणत तो कसंबसं बोलला, "अग, पुढच्या आठवड्यात नवा स्टॉक येतोय. काय आहे ना, लोकांना पडून राहिलेला स्टॉक चालत नाही. त्यांना नव्या कोऱ्या पानांचा गंध आवडतो." पूर्णिमा तिच्याच विचारात गुंतली होती.

ती भानावर येत म्हणाली, "दादा, आपण रात्री निवांत बोलू या." असं म्हणून ती पटकन निघून गेली. त्यानंतरच्या अर्ध्या तासात काऊंटरवर एक व्यक्ती येऊन उभी राहिली. बघता क्षणीच एखादा उच्च अधिकारी असावा अशा व्यक्तिमत्वाचा तरूण होता.

"आपणास काय हवंय?" हे विचारायच्या आधी त्यानंच संवाद साधला, "हे बघा, काही होतकरू आणि गरजू विद्यार्थ्यांना शालेय वह्या, पेन्सिल्स, कंपास बॉक्सेस पुरवायच्या आहेत. आमच्या शेटजींनी खास तुमच्याकडे पाठवलं आहे." असं



म्हणून त्या तरूणानं एक यादी पुढे केली. मनातल्या मनात आकडेमोड करत, विश्वास कागदावर हिशेब मांडत होता. हिशेब *वीसेक हजाराच्यावर जात होता. एवढा माल उधारीत कोण देणार? असं विचार करत असतानाच, रोख वीस हजार रूपये काऊंटरवर ठेवत त्या तरूणानं सांगितलं, "मोठ्या विश्वासाने आम्ही तुमच्याकडे आलो आहोत. भाव वाजवी लावा. हे निरपेक्ष मनानं करत असलेलं धर्मादाय कार्य आहे. या कानाचं त्या कानाला लागू देऊ नका. दहा दिवसांनी येईन आणि राहिलेला हिशेब करून माल घेऊन जाईन. कळलं? माझं नाव अमेय निरगुडकर." कच्ची पावती घेऊन, तो तरूण निघून गेला. त्याचा मोबाईल नंबर घ्यायचंही विश्वासला भान राहिलं नाही. कोविडमुळे गेली दोन वर्षे अतिशय खडतर गेली. आता चांगले दिवस येतील अशी आशेची किरणे दिसत होती.

पूर्णिमा घराजवळच्या सुपर मार्केटमधे शिरली. ट्रॉली भरून वस्तु, भाज्या आणि फळे घेतली. पेमेंट करून घरच्या पत्त्यावर पोहोचवायला सांगून शेजारच्या स्टेशनरी शॉपवर आली. त्यावेळी विशेष गर्दी नव्हती. 'मी एका फायनान्स कंपनीत आहे. स्टेशनरी दुकानासाठी कर्ज मागणीचा अर्ज आला आहे तर थोडीशी माहिती द्याल काय?' असं म्हणून रोजची विक्री किती, नफ्याचं मार्जिन किती? हे सगळं तिनं जाणून घेतलं. त्यानंतर तिने लेटेस्ट खरेदीची बिलं मागून घेतली. त्यांच्या परवानगीने आठ दहा बिलांचे मोबाईलने फोटो घेतले. त्यांचे आभार मानून ती घरी आली.

तिने घरात आल्या आल्या दादांना भेटून आल्याचं वहिनीला सांगितलं. तितक्यात सामानाची होम डिलीव्हरी आली. लगेच लॅपटॉप उघडून ती काहीतरी करत बसली. दुकान बंद करून विश्वास आला. तो फ्रेश होऊन आल्यावर, मनसोक्त गप्पा मारत सगळ्यांनी कढी खिचडीवर ताव मारला. त्यानंतर विषयाला हात घालत पूर्णिमा म्हणाली, "दादा, तू प्रधानमंत्री मुद्रा योजनेतून खेळतं भांडवल का घेत नाहीस? त्याला काय लागतं रे? ओळखीचा पुरावा, रहिवासी पुरावा, व्यवसायाचा परवाना आणि व्यवसायासाठी लागणाऱ्या मटेरियलचे कोटेशन्स व बिलं. बस्स. ना स्वतःच्या भाग भांडवलाची गरज, ना जामीनदार आवश्यक. आणखी काय हवंय?"

"वन्सं, मीच कर्ज काढायला नाही म्हणते. ते आणखी कोण डोक्यावर घेणार, नाही ती चिंता." सुनंदा बोलली.

"वहिनी, अग व्यापारासाठी काढलेल्या कर्जाची कसली चिंता करायची? ते का आपण उपभोगासाठी घेत आहोत काय? कर्जाच्या रकमेतून विक्रीसाठी लागणारा माल खरेदी करतोय. व्यापारासाठी खेळत्या भांडवलाची आवश्यकता असते."

मोबाईलमधील बिलांचे फोटो फॉरवर्ड करून विश्वासला सांगितलं, "याप्रमाणे सर्व स्टेशनरी आणि कॉम्प्युटरसाठी लागणाऱ्या व विविध प्रकारच्या वस्तुंची यादी बनव आणि कोटेशन्स घेऊन ये. झेरॉक्स कम प्रिंटर मशीनचं कोटेशनही घेऊन ये. मी प्रोजेक्ट रिपोर्ट बनवून देते. आपण बॅंक प्रपोजल करू." विश्वासनं मान डोलावली.

पूर्णिमा सकाळीच ट्रेनिंगसाठी निघून गेली. विश्वासने सामानाची यादी केली. स्टेशनरीसाठी वीस हजार रूपये ॲडव्हान्स दिलेल्या माणसासाठी होलसेल व्यापाऱ्याकडे जायचंच होतं. त्याने वीस हजार रोख देऊन सगळ्या मालाची ऑर्डर नोंदवली.

मुद्रा लोनसाठी आवश्यक कोटेशन्स घेऊन आला. पूर्णिमाने सांगितलेल्या बॅंकेच्या ब्रॅंच मॅनेजरकडून ॲप्लीकेशन फॉर्म आणून भरून ठेवलं. पूर्णिमाने पुढच्या पाच वर्षाचे बॅलन्स शीट आणि नफातोटा पत्रक बनवलं. विश्वासला फॉरवर्ड करून प्रिंटाऊट काढून सगळी कागदपत्रे बॅंकेत सादर करायला सांगितलं.

बघता बघता आठवडा झाला. पूर्णिमा रोज फोनवरून प्रदीपशी, मुलाशी ख्याली खुशालीचं मोजकंच तेवढं बोलत होती.

सोमवारी तिला सुटी होती. ती भावासोबत बॅंकेत गेली. तीन लाखाच्या कर्जाच्या कागदपत्रावर सह्या झाल्या. कोटेशन्स दिलेल्यांच्या नावाने बॅंकर्स चेक निघाले. व्यापाऱ्यांनी माल पाठवला. दुसऱ्या दिवशी झेरॉक्स-कम-प्रिंटर मशीनही आलं. "विश्वास स्टेशनर्स" हे नवं साईनबोर्ड लागलं. *पुष्पहार घातलेल्या आईबाबांच्या तसबिरीकडे पाहिल्यावर, आज ते नक्कीच संतुष्ट झाले असतील असं पूर्णिमेला वाटून गेलं.

कारण विश्वास शिक्षणात प्रगती करू शकला नाही याची आईबाबांना खंत वाटायची. राहायला बाबांचा हा टू बेडरूम्सचा फ्लॅट होता. पूर्णिमाचं धूमधडाक्यात लग्न लावून दिल्यानंतर, बाबांनी उरलेली सगळी पूंजी दुकानावर खर्ची घातली होती.

सायंकाळची फ्लाईट होती. पूर्णिमा आवराआवर करत होती तेव्हा तिच्या कानावर पडलं, "अग, आई आत्याला ही साडी काय देतेयस? भारी साडी घेऊन द्यायचीस ना? ही साडी बाबांनी तुला दिवाळीसाठी आणलेली होती. तू यासाठीच घडी न मोडता ठेवलीयस का?" सुनंदा तिला समजावत म्हणाली, "अग, कोविडमुळे बाबांचा व्यापारच बंद होता तर मी कसं दिवाळसण साजरा करायचा सांग. आता व्यापार चांगला चालेल. तुझे बाबा या दिवाळीला छानशी साडी आणतीलच. नाही दिली तर मी मागून घेईन. बरं चल, आत्या निघेल आता. बाबाही येत असतीलच."

त्या दोघी बाहेर येताच पूर्णिमा म्हणाली, "वहिनी, शर्वरी शाळेत गेली की तूही दुकानावर जात जा. आजूबाजूच्या ऑफिसेस, बॅंकांत व्हिजिटींग कार्ड देऊन, फोनवर सांगितलंत तर सगळी स्टेशनरी जागेवर पुरवू असं सांगा. आणि दुसरं असं की शर्वरीसाठी मला काहीही आणता आलं नाही, तू तिच्यासाठी एक ड्रेस घेशील?"

अहो, कशाला?" असं सुनंदा म्हणत असतानाच पूर्णिमेने शर्वरीच्या हातात एक बंद पाकीट दिलं. "छकुली तुम्ही खरेदीला जाल त्या दिवशी हे पाकीट उघड. नाहीतर तुझी आई हे पैसे घरसामानासाठी वापरेल." असं ती हसत हसत म्हणाली. तितक्यात विश्वास धापा टाकतच आला आणि म्हणाला, "अगं तो निरगुडकर आज चार वाजता येणार होता. तासभर वाट पाहून आलो." पूर्णिमा गूढपणे हसत म्हणाली, "दादा, मला नाही वाटत तो परत येईल असं."

सुनंदाने पूर्णिमेला हळदीकुंकू लावून साडी आणि चोळखण दिलं आणि घट्ट मिठी मारली. शर्वरी आत्याला प्रेमाने बिलगली. विश्वासचे डोळे नकळत ओलावले.

कंपनीची कार आली. पूर्णिमा हसतमुखाने निघाली. शर्वरीनं सुनंदाच्या हातात पाकिट दिलं. पाकिट जड वाटत होतं. उघडून पाहतो तर काय- दोन हजार रूपयाच्या दहा नोटा होत्या! एक चिठ्ठी होती, "वहिनी, तुझ्या नणंदेकडून ही छोटीशी भेट. शर्वरीला एक चांगला ड्रेस घे, तू एक छानशी साडी घे आणि माझ्या भावासाठी पॅंट्स आणि शर्ट्स घे. मी पुन्हा कधी येईन ते माहीत नाही. शर्वरीच्या लग्नात मात्र मी दहा दिवस अगोदर येऊन राहीन. स्वतःची आणि माझ्या भावाची काळजी घे."

विश्वास अवरूद्ध कंठाने बोलला, "सुनंदा तू माझी लाज राखलीस. ऐनवेळी घरसामान मागवून घेतलंस ते." सुनंदा बोलून गेली, "अहो, मी कुठे तुम्हीच तर.." तितक्यात विश्वासचा मोबाईल फोन खणखणला, मी निरगुडकर बोलतोय. यावर्षी आमचं वह्या पेन्सिली वाटायचं रद्द झालंय. पुस्तकं वाटणार आहोत. आमचे वीस हजार रूपये अनामत म्हणून ठेवा. पुढच्या वर्षी बघू." एवढं बोलून फोन कट झाला. विश्वासने नंतर त्याच नंबरवर फोन लावला तर तो नंबर टेलिफोन बूथचा होता. निरगुडकर येणार नाहीत हे पूर्णिमेने आधीच सांगितलं होतं. विश्वासला एका मागोमाग घडत गेलेल्या घटनांची संगती लागली. निरगुडकरने दोन हजारच्या दहा कोऱ्या नोटा दिल्या होत्या. पूर्णिमेने दिलेल्या पाकिटातही दोन हजाराच्या दहा कोऱ्या नोटा होत्या. सगळं रहस्य स्पष्टपणे उलगडलं. विश्वास भावनाविवश होत म्हणाला, "सुनंदा, मला आज दत्ता हलसगीकरांच्या कवितेच्या ओळी आठवतात.

आभाळाएवढी ज्यांची उंची त्यांनी थोडेसे खाली यावे...मातीत ज्यांचे जन्म मळले, त्यांना उचलून वरती घ्यावे...! माझ्या बहिणीने त्या ओळी सार्थ केल्या आहेत. ती काही दिवसासाठीच आली आणि जाता जाता आपल्या भावाच्या घरात लक्ष्मीची पावलं उमटवून गेली.

## रक्षाबंधन...!

राखी पौर्णिमेला तुला
ओवाळीते भाऊराया,
आयुष्यात माझ्यावर
असू दे तुझीच माया.



लहाणपणी आपण
दोघे खूप भांडायाचो,
राग शांत झाल्यावर
पुन्हा एकत्र खेळायाचो.

बाबा, तुला मारतांना
रडू मला येत होते,
आई, मला मारतांना
रडू तुला येत होते.



ईश्वरा ! माझ्या भावाचा
बळकट कर हात,
येणाऱ्या संकटावर
तो सदा करीन मात.

हे प्रभु ! माझ्या भावाच्या
दुःख- यातना सरू दे,
त्याच्या कमाईत सदा
बरकत ही उरू दे.

पवित्र राखी बांधून
करते मी आराधना,
भावाला माझ्या सुखी ठेव
देवा ! ही माझी प्रार्थना...!

अय्युब पठाण लोहगांवकर
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.

## भाऊ पाठीराखा



रक्षाबंधनाचा सण
भाऊ-बहिण नात्याचा
रंगी-बेरंगी राख्यांचा
धागा मायेच्या मोत्याचा

पाट सजवे बहीण
छान रांगोळीचा थाट
लाउनिया निरांजने
हाती औक्षणाचे ताट

राखी बांधता हाताला
भाऊ आनंदून जाई
माया पाहून दोघांची
माय-पिता धन्य होई

भाऊ सांगतसे तिला
तू माझी ग बहिण
सदा रक्षण करण्या
तुझ्या पाठीशी राहिण

बोले बहिण भावाला
बंधू सांगते रे तुला
मिळो पाठीराखा भाऊ
जगी साऱ्या बहिणींला

- महादेव बी. बुरुटे, शेगाव, ता. जत,
जि. सांगली , मो. 9765374805

# छत्रपती शिवराय आणि मावळे : निस्सीम मैत्रीचा आदर्श




किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**छत्रपती शिवाजी महाराज फक्त महाराष्ट्रासाठीच नव्हे तर जगातील उत्कृष्ट रणनीती उत्कृष्ट प्रशासन यांच्यासाठी एक प्रेरणास्थान आहेत. आईचा सर्वोत्कृष्ट पुत्र, वडिलांच्या साठी एक आज्ञाधारक मुलगा, आदर्श पती,एक जबाबदार पिता ह्यासाऱ्या सोबत सर्वात महत्वाचे म्हणजे एक प्रजादक्ष जाणता राजा म्हणून आपण छत्रपती शिवाजी महाराज यांना ओळखतो. मात्र मनस्वी मैत्रीच्या नात्याचा जेव्हा विचार याची वेळ येते तेव्हा आपण ह्या दिलदार आणि उमद्या मनाच्या राजाच्या एक उदाहरण फार अभावानेच देतो दिसून येते. खरे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे हे त्यांचे सैन्य किंवा सेवक ह्या परिभाषेत बसतच नव्हते तर ते सर्व त्यांचे अगदी जिवाभावाचे मित्र होते. त्यातील अनेकजण तर बालपणापासून त्यांच्यासोबत होते असे आपल्या लक्षात येते. रायरेश्वराच्या मंदिरात शिवबासोबत स्वराज्याची स्थापना करण्याची शपथ घेताना हजर असलेले काही मावळे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सोबत शेवटपर्यंत राहिले आणि स्वराज्याचे मुख्य शिलेदार म्हणून ओळखले गेले.**

रायरेश्वराच्या मंदिरात कान्होजी जेधे, बाजी पासलकर, तानाजी मालुसरे, सूर्याजी मालुसरे, येसाजी कंक, सूर्याजी काकडे, बापूजी मुदगल, नरसप्रभू गुप्ते, सोनोपंत डबीर या आपल्या बारा मावळातील सवंगडी यांच्या साथीने २७ एप्रिल १६४५ रोजी स्वराज्याची शपथ घेतली.अफजलखानाच्या स्वारीच्या वेळी महाराजांनी काही निवडक सरदारांना प्रत्येकी हजार मावळ्यांचे सैन्य दिले होते. तानाजी मालूसरे ह्यांनी त्यावेळी खानाच्या फौजेवर तुटून पडून उत्तम कामगिरी बजावली होती. सूर्याजी सुर्वे विरुद्धची लढाई आपण हरलो तर स्वराजावर कलंक लागेल हा विचार करून देशप्रेम आणि मित्रप्रेम ह्यासाठी निवडक सैन्यासह त्वेषाने लढून त्यांनी ती जिंकली. शिवरायांच्या ह्या बाल मित्राने स्वतःच्या मुलाचे रायबाचे लग्न बाजूला ठेवून कोंढाणा किल्ला सर करण्यासाठी महाराजांच्या ऐवजी स्वतः मोहिमेवर जाण्याचा निर्णय घेतला. पराक्रमाची पराकाष्टा करत त्यांनी किल्ला जिंकला परंतु ते स्वतः धारातीर्थी पडले. आपल्या बाल मित्राने स्वराज्यासाठी दिलेले बलिदान छत्रपती शिवाजी महाराजांनी लक्षात ठेवले तानाजीचा मुलगा रायबा ह्याचा लग्नाला जिजाऊ माँ साहेब ह्यांच्यासह उपस्थित राहून त्यांनी रायबाचे लग्न लावून दिले.तानाजी मालुसरेच्या स्मृतिप्रीत्यर्थ शिवरायांनी कोंढाणा गडाचे नाव बदलूनसिंहगड असे ठेवले. तसेच तानाजी जिथे मरण पावले त्याठिकाणी त्यांच्या समाधीचा चौथरा ज्याला वीरगळ म्हंटले जायचे तो सुद्धा शिवरायांनी उभारल्याचे पुरावे सापडले आहेत. कोंढाणा लढाई झाल्यावर पुढे साधारण 5 वर्षांनी रायबा 14-15 वर्षाचा म्हणजे सक्षम झाल्यावर शिवरायांनी त्याला पारगड ह्या किल्ल्याची जहागीरदार देत एका ताम्रपटावर चंद्रसूर्य असे पर्यंत किल्ला सांभाळावा असे लिहून दिल्याचा उल्लेख काही ठिकाणी सापडतो. ह्यावरून तानाजी आणि शिवराय उभयंताची मैत्री किती अतूट आणि गाढ होती ह्यांची प्रचिती येते. तानाजीचे बंधू सूर्याजी हे सुद्धा शिवरायांच्या सोबत स्वराज्य स्थापनेच्या प्रतिज्ञेपासून होते त्यांनाही महाराजांनी शेवटपर्यंत अंतर दिले नाही त्यांच्या सोबतच्या मैत्रीची जोपासना केली. येसाजी कंक हे शिवरायांचे बालमित्र त्याच्या सोबत अफजलखान वध ते गोवळकोंड्याच्या बादशहाच्या भेटीप्रसंगापर्यंत अनेकदा सोबत होते. आपल्या मित्राच्या राज्याचा इशाऱ्यावरून जीवाची पर्वा न करता पिसाळल्या हत्तीसमोर हातात तलवार घेऊन स्वराज्याचा एक एक शिलेदार हत्तीच्या पेक्षा जास्त सामर्थ्यवान आहे असे सिद्ध करणारा येसाजी कंक हा मैत्रीत जीव पणाला लावण्याऱ्या मित्राचे मूर्तिमंत उदाहरण आहे. येसाजी आणि त्यांचा मुलगा कृष्णाजी संभाजीराजे ह्यांच्या काळातही स्वराज्याशी बांधील होते पोर्तुगीजा विरुद्ध लढताना ह्या पितापुत्रांनी पराक्रमाची शर्थ केली कृष्णाजीस ह्या लढाईत वीरमरण आले तर येसाजी जायबंदी झाले.छत्रपती संभाजी राजांनी सुद्धा येसाजीचा यथोचित गौरव केला व शेवटपर्यंत अंतर दिले नाही.बहिर्जी नाईक हे मराठ्यांच्या इतिहासातील



एका महानायकाचं नाव होय. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्यावेळी स्वराज्याची शपथ रायरेश्वराच्या मंदिरात घेतली त्यावेळीपासुन ते महाराजांच्या निधनापर्यंतचा साथीदार म्हणजेच बहिर्जी नाईक होते. खरेतर दिवसभर बहुरुप्याचे खेळ करुन पोट भरवणारे बहिर्जी महाराजांना भेटणे आणि महाराजांनी त्यांच्यातील कसब ओळखून, त्यांना त्या स्वराज्याच्या कामात रुजु करुन घेतले. आणि बहिर्जी ह्यांनी त्यांना एका जवळपास सर्व मोहिमेत महत्वाची खबरबात पुरवली. गुणी माणसाला आपलं करून त्यांची दृढ मैत्री ही शिवरायांची खास नीती होती त्यात माणूस जोडणे आणि स्वराज्याची पायाभरणी करणे हा प्रामाणिक हेतू होता. मुरारबाजी देशपांडे हा शिवरायांचा असाच एक मावळा, जावळीच्याचंद्रराव मोऱ्यांशीझडलेल्या संघर्षात श्रीमंत छत्रपतीशिवाजीराजे भोसले यांना मोऱ्यांच्या सैन्यातून लढणाऱ्या मुरारबाजीच्या युद्धकौशल्याचे विलक्षण कौतुक वाटले. स्वराज्यनिर्मितीच्या लढ्यात अशा शूर मावळ्याचा उपयोग होईल हे जाणून जावळीच्या विजयानंतर श्रीमंत छत्रपतीशिवाजीमहाराजांनी मुरारबाजीला मराठा सैन्यात दाखल करून घेतले. पुढे मुरारबाजी शिवारायांच्यासाठी लढत असताना पुरंदरच्या लढाईत वीरगतीस प्राप्त झाले, शिवरायांनी त्यांच्या स्मारक म्हणून वीरगळ म्हणजेच एक दगडी चिरेबंदी समाधी किल्ल्यावर उभारली. बाजी प्रभू ददेशपांडे हे मूळ हिरडस मावळचे वतनदार असणाऱ्या बांदलांचे दिवाण होते. बाजींचे प्रशासकीय कौशल्य आणि शौर्य पाहून श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांनी हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आपलेसे करून घेतले. बाजींनीही स्वराज्यासाठी आपली निष्ठा श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांना समर्पिली. घोडखिंड लढविणे आणि महाराज गडावर पोहचे पर्यंत जीवात जीव आहे तोवर लढणारे बाजीप्रभू आपल्याला ठाऊक आहेत.बाजींप्रभूंच्या स्वराज्यनिष्ठांच्या पवित्र रक्ताने घोडखिंड पावन झाली म्हणून महाराजांनी तिचे नाव पावनखिंड असे ठेवले . बाजीप्रभू देशपांडे ह्यांचेवर विशाळगडावर त्यांच्या धारातीर्थी पडलेल्या फुलाजी ह्या बंधुसह शिवाजी महाराजांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. बाजीप्रभू व फुलाजी यांची समाधी विशाळगडावरबांधली गेली. ज्यांनाना 'प्रतिशिवाजी' म्हटले जायचे ते नेताजी पालकर हे महाराजांचे आणखी एक विश्वासू मित्र होते. अफजलखानाच्या वधाच्या वेळी अफजलखानाच्या सैन्याला हुसकावून लावण्यात नेताजींनी सिंहाचा वाटा उचलला होता. राजकीय धुष्मचक्रीत पुरंदरच्या तहानंतर श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांनी वादविवादाचा बनाव करून त्यांना मोगलाकडे पाठविले, साधारणपणे नऊ वर्षांनी नेताजी पुन्हा स्वराज्यात आले. शिवरायांनी नेताजी स्वराज्यात परत आल्यावर योग्य विधी पार पाडून त्यांना परत हिंदू धर्मात प्रवेश दिला, व त्यांच्या मुलाचा जानोजी पालकरचा स्वतःच्या मुलीशी राजकन्या कमलाबाई ह्यांच्याशी विवाह करून दिला. आणि आपल्या मित्राच्या निष्ठेचा ऋणानुबंध कायम केला. कडतोजी गुजर ह्यांनी मोगलाईतील अन्याय सहन न झाल्याने मोगलांशी आपल्या गावातून लढा पुकारला होता . एकदा मोगलांच्या खजिन्यावर एकाच वेळी दोन मराठी वाघांनी झेप घेतली ते म्हणजे शिवराय आणि कडतोजी ह्यांनी त्यावेळी झालेल्या भेटीत शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा विचार सांगून ती भेट मैत्रीत परावर्तित केली. कडतोजीची स्वराज्यनिष्ठा आणि पराक्रम पाहून महाराजांनी त्यांना स्वराज्याचे सरनौबत केले त्यांच्या पराक्रमाला साजेसे असे प्रतापराव हे नाव दिले. स्वराज्यासाठी लढताना वीरमरण आलेल्या आपल्या ह्या मित्राच्या कन्येला म्हणजेच जानकीबाई ह्यांना राजाराम ह्या आपल्या पुत्रासाठी मोठमोठी स्थळ नाकारून त्यांनी पसंती दिली आणि मित्राच्या मुलीला सून करून घेतले. ह्याशिवाय जिवाजी महाले, मदारी मेहतर, शिवा काशीद, असे अनेक मावळे शिवरायांच्या स्वराज्याचे शिलेदार म्हणून आपल्याला ठाऊक आहेत. आता प्रश्न असा आहे की ह्या सर्व स्वराज्य शिलेदारांना सैनिक म्हणायचे का? मला वाटत ह्या सर्वांना फक्त सैनिक म्हणणे हा छत्रपती शिवराय आणि ह्या सर्वांच्या मध्ये असलेल्या मैत्रीच्या नात्याला कमी समजणे असेल. शिवरायांच्या साठी मावळ्यांनी जे केले आणि मावळ्यांच्या साठी शिवरायांनी जे केले, जो ऋणानुबंध जपला असे नाते जगाच्या पाठीवर कोणताही राजा आणि त्यांचे सैन्य ह्यात दिसत नाही म्हणून शिवराय ह्यांच्यासाठी लढणारे मावळे हे त्याचे सैन्य नसून त्यांचे जिवाभावाचे मित्र होते, मैत्रीचे पावित्र्य जपणारे मावळे आणि शिवराय ह्या दोघांच्याही त्याग, समर्पणवृत्ती, साहस, दूरदृष्टी आणि मैत्रीला मनःपूर्वक सलाम करताना म्हणावे वाटते,

राजा एक आगळा-वेगळा विराजमान मराठी मनावरती
स्वराज्याचे जणू चांदणे विस्तारले महाराष्ट्राच्या मातीवरती
राजे, छत्रपती अन शिवबा
पुकारा कोणत्याही नावे कोणी
जाणता राजा, संह्याद्रीचा छावा
शक्तीयुक्तीने शत्रूंना पाजले पाणी
संह्याद्रीशी नाळ त्यांची आणि तितकेच प्रेम दर्यावरती
स्वराज्याचे जणू चांदणे विस्तारले महाराष्ट्राच्या मातीवरती
जनसेवेस्तव आयुष्य वेचुनी
जणू चंदनाचा गाभा झिजावा
गनिमीकावा ह्या यशमंत्रामधुनी
स्वातंत्र्यचा अढळ सूर्य उगावा
हा सूर्य तो अढळ आहे, राहो महाराष्ट्राच्या क्षितिजावरती स्वराज्याचे जणू
चांदणे विस्तारले महाराष्ट्राच्या मातीवरती
मयूर सिंहासना नव्हे तो ह्रदयी विराजे
मावळ्यांच्या सवे रयतेचा राजा होता
रयतेच्या ह्रदयी असे चिरंतन जो
आमचा एक जाणता राजा होता
तो गरुड उंच नभातला अधिराज्य सांगतो क्षितिजावरती
स्वराज्याचे जणू चांदणे विस्तारले महाराष्ट्राच्या मातीवरती

# भारतीय राजकारणी आणि लोकशाही



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**1984 नंतर देशात गेली आठ वर्षे सोडता सतत गठबंधन सरकारेच सत्तेत होती. केंद्रात एकपक्षीय सरकार असले म्हणजे बहुमताने कठोरातील कठोर निर्णय घेता येतात. परंतू नरसिंह राव काय किंवा अटलबिहारी वाजपेयी काय यांची सरकारे पूर्ण टर्म टिकली तरी ती गठबंधनचीच होती. अनेक पक्षांचे मिळून बनवलेले सरकार हे अनेक संकटांना तोंड देत चालवावे लागते. कोणी काही म्हणो पण स्वार्थ आणि उत्पन्न याच दोन निकषांवर राजकारणी लोकांचा फोकस असतो. मग प्रत्येक निर्णयात लागेबांधे, नफा नुकसान पाहूनच निर्णय होतात. त्यात जनहित किंवा देशाच्या विकासातील अपरिहार्य गरज गौण ठरतात. उदाहरणार्थ रिफायनरी प्रकल्प कोकणातला आणि किंवा आरे च्या जागेतील मेट्रो टर्मिनल. प्रत्येक निर्णयात अनावश्यक चर्चा घडवणे, तथाकथित खोटे आणि खोटारडे बुध्दीजिवी म्हणवणाऱ्यांची तर्कटे ऐकून खोडा घालणे यातच राजकारणी अडकलेले असतात.**

बरे या लोकांचा भ्रष्टाचार, खाण्याचे अद्भुत मार्ग आणि सरकारी पैशांचा विविध योजनांचे नावाखाली होणारी लूट हे उद्वेक जणक असते. पण सहनशील आणि शेजाऱ्याचे जळतय नां, आपल्या घराला आग लागल्यावर बघू ही वाढलेली वर्तणूक, किंवा वैचारिक बैठक खुप नुकसान करत आहे. आरे ची जागा पर्यावरणाचे नावाखाली मेट्रोला देण्यास विरोध करणाऱ्यांचा उद्देश रास्त असता तर समजून घेतले असते. पण एकीकडे विरोध करायचा आणि त्याचवेळी आपल्या मर्जीतल्या किंवा आपल्या मागण्या पूर्ण करू ईच्छीनाऱ्या बांधकाम व्यावसायिकांना त्या फूकटभाव देऊन आपले घर भरायचे असले उद्योग बिनधास्त आणि बिनबोभाट चालतात. रिफायनरीला सेना विरोध करते तर भाजप पाठिंबा देतो. मग त्यात अकारण वाद उद्भवणारे विषय चर्चेत आणून मिडीया मध्ये बुध्दिजिवींच्या चर्चा सत्रांचे दळण दळल्या जाते. या अशा विकासाच्या, बचतीच्या योजना उत्तम प्रकारे राबवताना जर सरकार मजबूत आणि एकपक्षीय सत्तेत असेल तर निर्णय घेणे सोपे जाते आणि विनाविलंब काम पूर्ण करून खर्चात ही बचत करता येते. उदाहरणार्थ परवा नरेंद्र मोदींनी उदघाटन केलेल्या एका राष्ट्रीय महामार्गाचे देता येईल. सदरचा महामार्ग विहीत मुदती पूर्वी पूर्ण करून दाखवुन तब्बल अकराशे का पंधराशे हजार कोटी नितीन गडकरींनी वाचवले असे खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच जाहीर केले.

सेंट्रल व्हिस्टा या नविन संसद भवन, मंत्रालये, पंतप्रधानांचे कार्यालय, दोन्ही सभागृहे आणि अनेक सरकारी कार्यालये एकाच इमारतीत घेण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने हे काम हाती घेऊन विक्रमी कमी वेळेत पूर्णत्वास नेले. त्यालाही प्रचंड विरोध केला काँग्रेस आणि कांही विरोधीपक्ष नेत्यांनी. का केला असेल विरोध, तर आज ही सर्व सेंट्रल व्हिस्टा मध्ये स्थलांतरित होणारी सरकारी कार्यालये खाजगी भाड्याच्या जागेत आहेत. त्या जागांचे मालक काँग्रेस आणि त्या बरोबर विरोध




करणारे आहेत. अवाच्यासवा भाडे आकारून गेली अनेक वर्षे हे लोक सरकारला लुटत आहेत. या जागांचे फक्त तीन वर्षांचे भाडे वाचले तरी या नवीन इमारतीचे बांधकामासाठी आलेला खर्च निघून जाईल. त्यासाठी केंद्रात एकपक्षीय बहूमताचे सरकार सत्तेत असावे. ते गेली आठ वर्षे आहे म्हणूनच जम्मु काश्मीर साठीचे अन्याय कारक कलम 35 ए आणि तीनशे सत्तर रद्द करता आले. जे काँग्रेस ने त्यांचे बहूमताचे मजबूत सरकार असून ही केले नव्हते. कारण काँग्रेस पक्षाची नियत साफ नव्हती, नाही आहे. सर्वसामान्य जनतेला हे प्रकार कळतच नव्हते कारण या पूर्वीची सरकारे चुपचाप असली कामे करत असत. किती लोकांना जम्मु काश्मीर मध्ये मुस्लिमेतर लोकांवर झालेले अमानवीय अत्याचार माहीत होते.

अब्दुल्ला घराणे आणि काँग्रेस यांनी संगनमताने हे घडवून आणले होते. त्यांचा हेतू जम्मु काश्मीर बाबत साफ नव्हता, नाहीये. तसे नसते आणि त्यांना देशाची काळजी असती तर पाकव्याप्त काश्मीरचा भूभाग कधीच सोडवून आपल्या ताब्यात घेऊन एकसंघ जम्मु काश्मीर राज्य मुख्य प्रवाहात आणले असते. पाकिस्तान सोबत झालेली दोन्ही युध्दे निर्विवाद जिंकुनही पाकव्याप्त काश्मीरचा भूभाग का वेगळाच राहीला. मुक्त का करून घेतला नाही. चीन सोबतच्या 1962 च्या युध्दात भारताचा सपशेल पराभव झाला भारताचा खुप मोठा भूभाग चीनचे ताब्यात गेला परंतू नेहरूंनी भिती पोटी सतत चीनशी दबकुन वागत खाली मान घालून कारभार केला. आज चीन का गप्प आहे. नरेंद्र मोदींनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा जो वचक निर्माण केला आहे तो पाहून चीन सिमा ओलांडू धजावत नाही.

आज जागतिक स्तरावर भारताला विश्वासात घेतल्या शिवाय मोठे आणि महाशक्ती म्हणून प्रगत असलेले देशही निर्णय घेत नाहीत. काँग्रेस ने देशाचा विकास केलाच नाही, सुधारणा केल्याच नाहीत असे अजिबातच नाही. परंतू करण्यापेक्षा खाल्ले जास्त याचे दुःख जास्त आहे. आता नितीशकुमार यांनी चौथ्यांदा आपलेच सहकाऱ्यांशी काडीमोड घेतला आहे. बरे हे घटस्फोट घेतात, दोन तीन वर्षे निट नांदतात, संसार करतात आणि निवडणूकांच्या वर्ष दिड वर्ष आधी फारकत घेतात आणि पुन्हा नव्याने संसार मांडतात. बरे ते कांही नवीन आणि राज्याच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी असे करतात म्हणावे तर तसेही काही नसते. बरं घरोबा ही त्याच त्याच दोन पक्षांशी आलटून पालटून करत राहतात. बिहार च्या जनतेलाच आता योग्य निर्णय घ्यावा लागणार आहे. घराणे, जातपात, सोयरसंबंध, धर्म, स्वार्थ यासर्वांना तिलांजली देऊन एकपक्षीय सरकार बहुमताने निवडून दिले पाहीजे. तरच नितीशकुमार यांचे हे चाळे बंद होतील. बिहारमध्ये तसे पाहीले तर फक्त भाजप आणि नितीशकुमार यांचा जेडीयु हेच दोन पक्ष एका घराण्याच्या अधिपत्याखाली नाहीत. बाकी राजद, जितनराम मांझी, चिराग पासवान, कुशवाहा वगैरेंचे सर्वच पक्ष कुटूंबा भोवती फिरणारे आहेत. आमच्या शरद पवार साहेबांसारखेच नितीशकुमार ही स्वबळावर सत्तेत येऊच शकत नाहीत. कुबड्या लागतातच. म्हणून भारतीय लोकशाही अजून मजबुत आणि लोकाभिमुख बनवायची असेल तर मतदारांनाच ठोस निर्णय घेऊन मतदान करताना राज्य हीत देश हीत ध्यानात ठेऊन मतदान करावे लागेल. येत्या 2025 च्या बिहारच्या विधानसभा निवडणुकीत ठरवून लोकशाही मानणाऱ्या पक्षाला स्पष्ट बहुमत देऊन बिहारचा विकास साधला पाहिजे.

# अन्न सुरक्षा सप्ताह : ई-कॉमर्स व अन्न व्यवसाय

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव

आधुनिक केसरी


**ई-कॉमर्स हि नवीन जगाची उदयोग संधी आहे, ही एक नवीन व्यापार करण्याची संधी आहे आणि आज आपण त्याबददल बोलणार आहोत. इलेक्ट्रॉनिक वाणिज्य अर्थात ई-कॉमर्स म्हणजेच इंटरनेटद्वारा उत्पादन आणि सेवांची करता येणारी खरेदी आणि विक्री होय. एका व्यापाऱ्याने दुसऱ्या व्यापाराबरोबर केलेल्या ईलेक्ट्रॉनिक वाणिज्याला बिझनेस-टू-बिझनेस (बी.टू.बी) असे म्हणतात. तसेच एका व्यापाऱ्याने थेट आपल्या ग्राहकाबरोबर केलेल्या ईलेक्ट्रॉनिक वाणिज्याला (बी.टू.बी) वाणिज्य म्हणतात.**

भारतीय ऑनलाईन ग्रॉसरी मार्केट २०२४ पर्यंत US$18.2 BILLION ईतके पोहचण्याची अपेक्षा करण्यात येत आहे , जी कि २०१९ मध्ये US$1.9 BILLION होती. NASSCOM च्या अहवालानुसार COVID - 19 मुळे तयार झालेले अडथळे पार पाडून भारतातील ई-कॉमर्स मार्केट ५ टक्के दराने २०२१ मध्ये वाढले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे वाढलेले SMARTPHONE, INTERNET जाळे आणि 4G नेटवर्क. IMAI आणि KANTAR RESEARCH च्या अहवालानुसार भारतात २०२५ पर्यंत 900 MILLION वापरकर्ते होण्याची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. आपल्यापैकी प्रत्येकाने आजपर्यंत एकदा तरी AMAZON , FLIPKART या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म वरुन खरेदी केलेली आहे.

इलेक्ट्रॉनिक वस्तू,उपकरणे व कपडे यासोबतच अन्न पदार्थ खरेदी व विक्रीसाठी देखील विविध ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म उदयास आलेले आहेत जसे की, प्रसिदध SWIGGY, ZOMATO, UBER ईंचा वापर मेट्रो शहरांसोबतच छोटया शहरात मोठया प्रमाणात होवू लागलेला आहे सदर ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मचा COVID - 19 च्या काळात ग्राहकांना सर्वाधिक उपयोग झाला असल्याचे सर्वांनी पाहिले आहे.

सध्याच्या काळात बदललेली जीवनशैली, वेळेचा अभाव, वाढलेले उत्पन्न, आंतरजालाचा फैलाव, पती व पत्नी दोघेही नोकरदार असणे ई. गोष्टींमुळे ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरुन घरपोच सुविधा उपलब्ध करुन घेण्याकडे कल वाढलेला आहे, ज्यामध्ये अन्नपदार्थ (उत्पादित व तयार) हा एक खूप महत्वाचा व प्रत्यक्ष आरोग्याशी संबध येणारा घटक आहे.

दिवसागणिक ई-कॉमर्स व्यवसायाची वाढती लोकप्रियता व भविष्यात वाढणारी व्याप्ती या अनुषंगे ई- कॉमर्स विक्रेता पासून ग्राहकाच्या हातात पडेपर्यंत पूर्ण, निर्भेळ व सुरक्षित अन्न पदार्थ पोचविण्याच्या दृष्टिने अन्न सुरक्षा व मानदे प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी ई-कॉमर्स अन्न व्यवसायासाठी मार्गदर्शक प्रणाली तयार केलेली आहे. ___ अन्न सुरक्षा व मानदे प्राधिकरण, नवी



दिल्ली ही अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ या अन्न पदार्थ संबंधातील कायदयातील सर्वोच्च प्राधिकरण आहे.

सदर प्राधिकरणास अन्नपदार्थ विषयक विविध मार्गदर्शक तत्वे व आदेश जारी करण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. त्याअनंषगे दि. १९ मार्च २०२१ रोजी अन्न सुरक्षा व मानद ( अन्न व्यवसाय परवान व नोंदणी ) सधारीत नियमन, २०२० मधील तरतुदी इ-कामस
वसायिकासाठी लागु करण्याचे निर्देश प्राधिकरणाने जारी केले.

सदर तरतदीनसार ई-कॉमर्स अन्न व्यवसायिकांचे दोन प्रकारात वर्गीकरण करण्यात आलेले आहे.

१) INVENTORY BASED MODEL OF E-COMMERCE FBOS:यामध्ये अन्न पदार्थ व सेवा या ई- कॉमर्स अन्न व्यवसायिकाच्या स्वतःच्या मालकिच्या असतात व ते स्वतःच्या ONLINE PORTAL (WEBSITE) द्वारे ग्राहकांना विक्री केले जातात. उदा DOMINOS, MCDONALDS, KFC ई.

2) MARKETPLACE BASED MODEL OF E-COMMERCE FBOS:यामध्ये ई -कॉमर्स अन्न व्यवसायिक हा त्याचे स्वतःचे ONLINE PORTAL (NETWORK) ग्राहक व विक्रेता / बॅड ओनर/ उत्पादक यांना वापरण्याची मुभा (सुविधा) प्रदान करतो. उदा. AMAZON, FLIPKART, INDIAMART, SWIGGY, ZOMATO, UBER ई.

सदर निर्देशांनुसार ई-कॉमर्स अन्न व्यवसायिकांनी खालीलप्रमाणे तरतूदींचे पालन करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

ई-कॉमर्स अन्न व्यवसायिकाने केंद्रिय परवाना प्राधिकरणाकडून परवाना प्राप्त करुन घेण्यात यावा.

अ. उ. रासकर
अन्न सुरक्षा अधिकारी, नाशिक

MARKETPLACED BASED MODEL संदर्भात ई-कॉमर्स FBO ने विक्रेत्यासोबत तो अन्न सुरक्षा व मानदे कायदयातील विविध तरतूदींचे पालन करेल असा करारनामा तयार करण्यात यावा. विक्रेत्यांनी त्यांचेकडील परवाना /नोंदणी प्रत ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित करावी. PRE-PACKED FOOD संदर्भात स्पष्ट व सुवाच्य असे PRINCIPAL DISPLAY PANEL चे चित्र DIGITAL PLATFORM वर ग्राहकांना समजण्यासाठी टाकण्यात यावे. पॅकिंग अन्नपदार्थ वितरीत करण्यासाठी बाहेर काढताना त्याची SHELF LIFE ही EXPIRY DATE च्या ३० टक्के किंवा ४५ दिवस अगोदरची असावी व केटरींग संदर्भात ताजे अन्नपदार्थ वितरीत करण्यात यावेत. अन्नपदार्थ वितरीत करण्यासाठी वापरण्यात येणारे पॅकिंग मटेरियल हे FOOD GRADE QUALITY चे असावे.

२ कामस अन्न व्यवसायिकाने अन्न सरक्षा व मानदे ( अन्न व्यवसाय परवाना व नादणी) नियमन २०११ मधील परिशिष्ट ४ मधील विविध तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे. ग्राहकांपर्यंतचे शेवटचे वितरण हे प्रशिक्षित तांत्रिक व्यक्तिमार्फतच करण्यात यावे. ई-कॉमर्स FBO ने कायदयातील तरतूदींचे उल्लंघन करणाऱ्या अन्नपदार्थांना तात्काळ सूचीतून काढून टाकणे बंधनकारक आहे ई-कॉमर्स FBO ने उच्च प्रतीचे CONSUMER GRIEVANCE REDRESSAL MECHANISM तयार करावे व येणाऱ्या तक्रारीसंदर्भात विक्रेत्यास कळवून लवकर सुधारणा करणेबाबत पाठपुरावा करावा. ई-कॉमर्स FBO ने त्यांच्या प्लॅटफॉर्मवर कोणत्याही अन्नपदार्थाची चुकीची व भ्रामक जाहिरात करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

तसेच या तरतूदींचे उल्लंघन करणाऱ्या ई-कॉमर्स अन्न व्यवसायिकांना शिक्षेची तरतूद कायदयात करण्यात आलेली आहे.

___ अशाप्रकारे बदललेली जीवनशैली, COVID 19 सारख्या अचानक उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्ती , वेळेचा अभाव ई.गोष्टींमुळे भविष्यात ई-कॉमर्स अन्न व्यवसाय प्रत्येकाच्या जीवनात मैलाचा दगड ठरणार आहे. त्यामुळेच अशा प्रकारच्या बदललेल्या अन्न व्यवसायाच्या स्वरुपास अनुसरुन ग्राहकांना निर्भेळ, पूर्ण, सकस व सुरक्षित अन्नपदार्थ पुरविण्यासाठी भारतीय अन्न सुरक्षा व मानदे प्राधिकरण व अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य हे कटिबध्द असून त्यांनी कंबर कसलेली आहे. सध्याच्या काळातील ग्राहक राजा हा सुज्ञ असून त्यांना निश्चितच भविष्यात ई-कॉमर्स प्लॅटफॉमवरुन अन्न पदार्थ मागविताना, सदर अन्न पदार्थ कायदयातील तरतूदींस धरुन आहे कि नाही हे ठरविताना ही माहिती उपयोगी ठरेल अशी आशा आहे.

# रक्षाबंधन : बहीण -भावाचे पवित्र बंधन

आधुनिक केसरी



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

**रक्षाबंधन हा सण भावाबहिणींचा सण म्हणून ओळखला जातो.राखीचा धागा साधासुधा नसुन अतुट बंधन आहे. भारतात सर्वच जातीधर्माचे लोक रक्षाबंधन मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरा करतात. यात भावाने बहिणीला दिलेले वचन अत्यंत महत्त्वाचे असते.पंचागानुसार श्रावण महिन्यातील म्हणजे राखी पौर्णिमा याला नारळी पौर्णिमा सुध्दा म्हणतात. हा सण भारतीय संस्कृतीच्या सणांमध्ये प्रमुख सण आहे. यामुळे बहिण-भावात उत्साहाचे वातावरण निर्माण होते. भारतात संपूर्ण राज्यात राखी पौर्णिमा वेगवेगळ्या पध्दतीने साजरी केली जाते.उत्तर भारतात कजरी पौर्णिमा,पश्चिम भारतामध्ये"नारळी पौर्णिमा"या नावाने हा सण साजरा केला जातो.**

पुराणात सांगितल्याप्रमाणे श्रावण पौर्णिमेला मोठ्यांचे आशीर्वाद पवित्र मानल्या जाते. पूर्वी मध्ययुगीन काळात भारतामध्ये बाहेरील आक्रमणापासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येत असे. महाभारतातसुध्दा बहिणभावाचे अतुट बंधन दिसून येते. श्रीकृष्णाच्या हाताच्या बोटाला जखम होऊन त्यातून रक्त वाहत होते त्यावेळी पांडवांची पत्नी द्रौपदीने आपल्या साडीची किनार फाडून श्रीकृष्णाच्या बोटाला बांधली आणि त्यांचा रक्तस्राव थांबवला. तेव्हापासून श्रीकृष्णाने द्रौपदीचे रक्षण करण्याचा संकल्प केला आणि आजीवन द्रौपदीचा भाऊ म्हणून तिचे रक्षण केले. म्हणजेच रक्षाबंधनाची परंपरा दैवी काळापासून आजपर्यंत सुरू आहे. यावरून हेच लक्षात येते की बहिणीच्या रक्षणासाठी भाऊ काहीही करायला तयार असतो. अशा इतिहासात अनेक गोष्टी आपल्याला पहायला मिळतात. चित्तोढगडची राणी कर्मावती हिने बहादुरशहापासून आपली रक्षा करण्यासाठी मुघल बादशहा हुमायूला राखी बांधली होती. राखी बांधल्यानंतर राजा हुमायूने राणी कर्मावतीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची बाजी लावली असे सांगण्यात येते. यावरून स्पष्ट होते की भाऊ आपल्या बहिणीच्या रक्षणासाठी "जान जाये पर वचन न जाये"अशी भूमिका बहिणीबद्दल भावांमध्ये दिसून येते. संपूर्ण भारतात रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. रक्षाबंधन म्हणजे बहीण-भावाच्या अतुट बंधन. म्हणजेच बहिण-भावाच्या नात्याचा सुवर्णमहोत्सव. कारण यामुळे दोघांचेही प्रेम एकत्र येऊन भाऊ बहीणीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो व कठीण प्रसंगी धावून येण्याचे वचन देतो. यामुळे बहिण-भावाचे प्रेम अफाट असल्याचे दिसून येते. सध्या बहिण-भावाप्रमाणे आज वृक्षांना आपल्या बंधनात बांधण्याची नितांत गरज आहे. बहिणीने भावाला राखी अवश्य बांधावी परंतु सोबतच एक वृक्ष भेट देऊन त्यांची जोपासना करण्याचे वचनसुध्दा घ्यावे. कारण दिवसेंदिवस हवामानात बदल होताना दिसत आहे. पूर्वी मुसळधार व संथ गतीने पाऊस यायचा परंतु हवामानात बदल झाल्याने मुसळधार पाऊसाचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढल्याचे दिसून येते व यामुळे ढगफुटीचे प्रमाणा सुध्दा वाढले आहे.यामुळे मानवी हानी, शेतीचे नुकसान, समुद्राच्या पातळीत वाढ, सुनामी,भुकंप, वादळ,विजकोसळने,अती उष्णता,अती थंडी ह्या संपूर्ण घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने निर्माण झाल्याचे दिसून येते.परंतु आपण येणाऱ्या संकटांशी सामना अवश्य करू शकतो.याकरीता रक्षाबंधनाच्या निमित्ताने संपूर्ण भारतात वृक्षारोपण व्हायला हवे. त्याचबरोबर बहिणीने भावाला किंवा भावाने बहिणीला काय मौल्यवान वस्तू भेट द्यायच्या आहेत त्या अवश्य द्याव्यात. परंतु बहिणीने भावाला व भावाने बहिणीला एक -एक वृक्ष भेट देऊन धर्तीमातेचे रक्षण करण्याचा संकल्प सर्वांनीच घेतला पाहिजे. यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल. येणारे पाऊसाचे पाणी जमिनीत मुरेल व पृथ्वीचे संतुलन सुरक्षित राहील, ग्लेशियर वितळणे थांबेल, वणव्याचे प्रमाण कमी होईल,भुकंपावर आळा बसेल, अशाप्रकारे निसर्गावर येणारे संकट वृक्षलागवडीमुळे हळूहळू कमी होण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल.



वृक्षलागवड सांस्कृतिक, सामाजिक,सण उत्सव, राष्ट्रीय कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय कार्यक्रम अशा कोणत्याही मार्गाने होने अत्यंत गरजेचे आहे.कारण यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर रहाण्यास मोठी मदत होईल व हवामानातील वाढता बद्दल यावर अंकुश लावण्यास सर्वांचा हातभार कामी येईल. त्याचप्रमाणे निसर्ग प्रफुल्लित रहाला तर देशात पर्यटनाला सुध्दा मोठी चालना मिळते.सध्या आपल्या जवळ जिवंत उदाहरण आहे ते म्हणजे श्रीलंकेचे.अनेक संकटातून जात असलेला श्रीलंका आपल्या आर्थिक सुधारणेसाठी पर्यटनाला महत्व देत आहे.कारण पर्यटन हेच त्यांचे आर्थिक माध्यम आहे. त्यामुळे रक्षाबंधनाचे औचित्य साधून बहिण-भावाने वृक्ष भेटीवर जास्त भर देण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सरकारने सुध्दा संपूर्ण सणांचे औचित्य साधून जास्तीत जास्त वृक्षलागवडीकडे लक्ष देण्याची गरज आहे.यामुळे पर्यटनाला चालना मिळेल व भारताचीही आर्थिक बाजू बळकट होईल.नारळी पौर्णिमा व रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा!








# मराठा सत्ता विजयाचा गौरवशाली इतिहास भावी पिढी समोर आदर्श : योगीराज महाराज डोळे

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** बीड जिल्हा इतिहास दिन १० ऑगस्ट बुधवार रोजी आहे. त्याच्या पूर्वसंध्येला दि.९ ऑगस्ट २०२२ रोजी क्रांतीदिन स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव व राक्षसभुवन येथील लढाई १० ऑगस्ट १७६३ रोजी झाली तो संग्राम २६० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. हा दिन इतिहास संकलन संस्था वतीने बीड जिल्हा दिन साजरा केला जातो. यावर्षी रणभुमी स्थळी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्री. क्षेत्र राक्षसभुवन येथे हा इतिहास दिन साजरा होत आहे. त्या निमित्ताने या लढाईचे वर्णन सोप्या शब्दात प्रा.डॉ. मुकुंद देवर्षी यानी विशद केले. मराठा सत्तेचा आत्मविश्वास जागृत करणारा रणसंग्राम राक्षसभुवन स्थळी घडला. क्रांती दिनानिमित्त प्रा.धनजंय जवळेकर यांनी माहिती दिली. बावणे नाईक सरदाराचे वंशज माणिक बावणे यांनी लढाईतील बावणे सरदारांचे योगदान सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना योगीराज महाराज डोळे यानी प्रतिपादन केले की, राक्षसभुवनचे ऐतिहासिक महत्व व येथील स्थळांची माहिती सांगितली तसेच पुढील वर्षी हा कार्यक्रम अधिक मोठ्या प्रमाणावर आपण साजरा करु तसेच व आपला मराठा सत्तेचा विजयाचा गौरवशाली इतिहास भावी पिढी समोर आदर्श आहे तो दिशादर्शक ठरेल.

स्वागताध्यक्ष भाऊसाहेब नाटकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शासन स्तरावर प्रयत्न करुन मराठा सत्ता विजयाचे पर्व राक्षसभुवन स्थळी स्मारक उभा करण्यासाठी सर्वांना सोबत घेवुन प्रयत्नरत राहुत असा मनोदय व्यक्त केला व हे क्षेत्र पर्यटन स्थळ म्हणुन विकसित होईल. डॉ. राधाकृष्ण जोशी प्रांताध्यक्ष यांनी महाराष्ट्रात इतिहास संकलन संस्था करत असलेल्या कार्याचा परिचय करुन दिला.

बीड जिल्हा इतिहास दिन व क्षेत्र अभ्यास भेट कार्यक्रमाचे अध्यक्ष योगीराज महाराज डोळे मठाधिपती दत्त संस्थान, स्वागताध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, वे.शा.सं. पोपट शास्त्री, वे.शा. सं. नाना व्यास महाराज, माणिक बावणे, प्रा.डॉ. राधाकृष्ण जोशी प्रांताध्यक्ष, प्रमुख वक्ता प्रा.डॉ. मुकुंद देवर्षी, रामप्रसाद देशमुख ई.स.सं. प्रांत संरक्षक, राजेश विर्धे जिल्हाध्यक्ष, प्रा.धनजंय जवळेकर सचिव, नंदकिशोर झरीकर मार्गदर्शक व्यासपीठावर उपस्थित होते. भारतमाता प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. कार्यक्रमात जयभवानी प्राथमिक विद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थीनीचा विशेष सहभाग होता. राक्षसभुवन ग्रामस्थ मधुकरराव पाठक, काकासाहेब नाटकर, कल्याण नाटकर, प्रभाकर पाठक, भगवान मोरे, महावीर खोबरे, नागेश चौथाईवाले, राहुल पाठक, अभय पाठक, संतोष काथवटे, भाऊ मोकाशी, राजेंद्र नाटकर उपस्थित होते. इतिहास संकलन संस्था प्रांत व जिल्हा पदाधिकारी सदस्य मान्यवर उमेश जगताप, प्रा.नागनाथ सांळुके, डॉ.भालचंद्र कुलकर्णी, राजकुमार चाटे, कालीदास चिटणीस, प्रा. काळुसे, प्रमोद देशपांडे, मुकुंद कुलकर्णी, संजय डोळे, वेदांग डोळे, डॉ. नंदाताई फटाले, शालिनी कुलकर्णी, सौ.पाठक सर्व उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. शशिकांत पसारकर सहसचिव प्रांत, प्रास्ताविक उदय पाठक यांनी तर आभार प्रदर्शन उध्दव बडे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# विभागीय क्रीडा संकुलात रंगला देशभक्तीपर गीतांचा सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** 9 ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त विभागीय क्रीडा संकुल येथे 16 हजार विद्यार्थ्यांनी सामुहिक राष्ट्रगीत गायले. यावेळी विविध देशभक्तीपर गीतेही सादर करण्यात आली. यावेळी ब्रिलियंट किड्स सीबीएसई, विद्या शिल्प पब्लिक स्कूल, ब्रिलियंट किड्स स्कूल विष्णुनगर या विद्यार्थ्यांनी अतिशय मनमोहक डोळ्याचे पारणे फेडणारे नृत्य सादर केले व हजारो विद्यार्थ्यांनी टाळ्याच्या गजरात त्यांना साथ दिली. यावेळी तिरंग्याच्या रंगातील टोप्या विद्यार्थ्यांनी परिधान केला होत्या. त्यामुळे सर्व विभागीय क्रीडा संकुल तिरंगामय झाल्याचे सुंदर दृश्य याठिकाणी पाहायला मिळाले. विभागीय क्रीडा संकुलावर राष्ट्रगीताच्या कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी सकाळी 9 वाजल्यापासून करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर केले. यावेळी व्यासपीठावर विधानसभेचे माजी अध्यक्ष हरिभाऊ बागडे, खासदार इम्तियाज जलील, जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, मनपा आयुक्त अभिजीत चौधरी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश गटने, पोलिस आयुक्त आणि पोलिस अधीक्षक यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात बालकलाकारांनी विविध नृत्य सादर केली. काही शाळांच्या मुलांनी भारतीय संस्कृतीचे दर्शन कुचीपुडी नृत्याच्या माध्यमातून घडवले. जवळपास एक तास हा कार्यक्रम सुरू होता.

यावेळी हरिभाऊ बागडे यांनी मुलांना शिस्त कशी महत्वाची आहे हे सांगत केंद्र सरकारने सुरू केलेल्या अग्निवीर योजनेचे महत्व देखील सांगितले. तर इम्तियाज जलील यांनी आगामी भारताचे भविष्य ही युवा पिढीच असून हे युवक भारताला जगात नंबर वन करतील, असा आशावाद व्यक्त केला.



# हर घर तिरंगा, घरावरील तिरंग्याची जबाबदारी कोण घेणार ?

## बी.एस.एफ. माजी सैनिक संजय जाधव यांचा सवाल

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** हर घर तिरंगा हे मिशन भाजपा सरकारने सुरू केली असून 1947 ला भारत देश स्वतंत्र झाला. भारताचा ध्वज तिरंगा असून या तिरंग्या ध्वजासाठी अनेक हुतात्म्याने आपल्या प्राणाची आहुती दिली, बलिदान दिले, अनेकांनी रक्त सांडले. परंतु भाजपातील केंद्र सरकारने 75 व्या अमृत महोत्सवानिमित्त हर घर तिरंगा प्रत्येक घरावर तिरंगा लावण्याचा ठरवले आहे. काहींना घरावर तिरंगा लावण्यासाठी घर नाही व ज्यांना घर आहेत अशांना तिरंगा लावून आपण जोखीम पत्करावी की नाही असा प्रश्न त्यांच्या मनात निर्माण होतो. सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. घरावर लावलेल्या तिरंग्यावर जर पाऊस आला वादळाने जर तिरंगा उडून गेला



? तर कोणावर कारवाई करणार ? कोण जबाबदार राहणार, असा प्रश्न बी.एस.एफ. माजी सैनिक संजय जाधव यांनी उपस्थित केला आहे.

त्यामुळे या तिरंग्याची जबाबदारी सरकार घेणार आहे का ? प्रश्न देखील त्यांनी विचारला आहे, म्हणजेच स्वातंत्र्याचा ध्वज माहिती करण्यासाठी हा सर्व खटाटोप आहे का ? शिवाय ग्रामीण भागातील लोक मोठ्या प्रमाणात शेतकरी आहेत. लोक कामा धंद्यात व्यस्त आहेत. लोक शेतात कामाला जातील की घरावर असलेला तिरंगा वर नजर ठेवत राहतील. त्यामुळे ही सर्व जबाबदारी शासनाने घ्यावी, अशी मागणी सुद्धा त्यांनी केली आहे.

# संत एकनाथ विद्यालयाच्या जनजागृती रॅलीतून हर घर तिरंगाचा संदेश.... !

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकीन :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त तालुक्यातील पैठण तालुका ग्रामीण विकास संस्था संचलित संत एकनाथ विद्यालय चितेगाव या शाळेच्या वतीने काढण्यात आलेल्या हर घर तिरंगा या जनजागृती रॅलीला गावासह पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी उत्स्फुर्तपणे प्रतिसाद दिला. यावेळी पहिली ते बारावी पर्यंतच्या विदयार्थ्यांनाी देशभक्तीपर घोषणा देत व विविध समाजोपयोगी संदेश देणारे घोषवाक्य असलेले लक्षवेधक फलक हाती घेत आपला सहभाग नोंदवला.


यावेळी गावातील प्रत्येक घरात व घरातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत जाण्याचा प्रयत्न या जनजागृती रॅलीतुन करण्यात आला. राष्ट्रप्रेम निर्माण व्हावे, आपल्या देशाला बलिदान आणि संघर्षातुन स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्यांचा इतिहास नवीन पिढीला कळावा यासाठी भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हा उपक्रम राबविला जात असल्याचे मुख्याध्यापक ज्ञानदेव शिंदे यांना सांगितले. भारताला स्वातंत्र्य मिळुन ७५ वर्ष पूर्ण झाले असल्याने हे वर्ष अमृतमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले जात असून १५ ऑगस्टचा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने संत एकनाथ विद्यालयाच्या प्रांगणात ७५ व्या स्वातंत्र्य दिनाच्या पाश्वभूमीवर विद्यालयाचे विज्ञान शिक्षक गणेश झिरपे, शिक्षिका श्रीमती अनंतवार, श्रीमती सुरासे यांच्या रचनेतून विद्यार्थ्यांच्या सहभागातून एकत्रित मानवी साखळी उभा करत ७५ या अंकातून हर घर तिरंगा व ७५ व्या अमृतमहोत्सवी वर्षाचे प्रासंगिक चित्र उभे करण्यात आले.

स्वातंत्र्याचा हा अमृतमहोत्सव अत्यंत काटेकोर व नियोजन पुर्वक शिस्तबद्ध वातावरणातील हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे सचिव गणेशराव पा वाघचौरे, सौ. वाघचौरे, संस्थेचे कोषाध्यक्ष सज्जनराव पा. घुंघार्डे, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक ज्ञानदेव शिंदे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भादे तसेच शाळेतील सहशिक्षक लघाने, नागे, नरवडे, खैरे, पाटील, कासुळे, जाधव, वाकळे, श्रीमती अनंतवार, श्रीमती सुरासे, गोर्डे, आव्हाड, बी.टी. शिंदे, मिसाळ, रोडी, अडसरे, गणेश झिरपे, प्राथमिक विभागाचे सहशिक्षक शिंपी, शिक्षिका चव्हाण, श्रीमती जाधव व शाळेचे मुख्य लिपिक कलिम पठाण, शेगुंळे, शिक्षकेतर कर्मचारी मालोदे, मलपुरे यांनी परिश्रम घेतले.

# अखेर त्या पत्रलेखिकेने घेतला मोकळा श्वास...

आधुनिक केसरी न्यूज

**भूम :** माणकेश्वर मंदिर येथील पत्रलेखिकेचे हे शिल्प न जाणो कित्येक वर्षांपासून शेंदुराच्या थराखाली झाकलेले होते. माणकेश्वर मंदिराच्या शेजारीच सटवाई देवीचे मंदिर आहे. या मंदिराच्या दर्शनाला असंख्य भाविक येत असतात. सटवाई देवी लहान मुलांचे भविष्य पाटीवर लिहिते अशी अख्यायिका आहे. सटवाई देवी मंदिराच्या बाजूलाच असलेल्या चालुक्यकालीन असलेले मंदिर ज्यावरुन या गावाचेही नाव पडले आहे, असे माणकेश्वर मंदिराच्या बाह्यांगावर पत्रलेखिकेचे शिल्प आहे. सटवाई देवीच्या अख्यायीकेशी साम्य दर्शविणारे लेखिकेचे हे शिल्प समजून लोकांनी त्यावर शेंदूर लावण्यास सुरवात केली. वर्षानुवर्षे शेंदूर लावले जात असल्याने मूर्तीवर जाड थर तयार झाला. त्यामुळे अक्षरशः मुर्तीचे मूळ स्वरुपही पूर्णपणे झाकले गेले. काल दि.४ ऑगस्ट २०२२ रोजी पुरातत्त्व विभाग, औरंगाबाद येथील अधिकारी मंदिराच्या पाहणीसाठी गेले असता, सदर प्रकाराबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली व मंदिर प्रशासन आणि गावकऱ्यांची समजूत काढून आपल्या गावात असलेल्या या प्राचीन व अतिशय महत्त्वपूर्ण अश्या वारश्याप्रती जागरूक होण्याबाबत गावकऱ्यांना आवाहन केले. ज्यास त्वरित प्रतिसाद देत मंदिर प्रशासन व गावकऱ्यांनी पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक संचालक व अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थितपणे मूर्तीचा अंदाजा घेत हळूवारपणे मुर्तिवर असलेला सर्व शेंदूर काढला. यादरम्यान शिल्पावरील जवळपास तीन ते चार इंच जाडीचा शेंदुराचा थर काढण्यात आला व अखेर या लेखिकेच्या शिल्पाने कित्येक वर्षांनी मोकळा श्वास घेतला. मंदिर संस्थान व गावकऱ्यांनी उर्वरित सर्व ठिकाणी लावलेला शेंदूर काढून परिसराची स्वच्छता करण्याची हमी देत यापुढे असा प्रकार होणार नाही याबाबत दक्षता घेण्याबाबतही




आश्वासन दिले. यामुळे बऱ्याच पुरातत्त्व व इतिहास प्रेमींना समाधान मिळाले असेल. लवकरच माणकेश्वर मंदिराच्या स्थळ व्यवस्थापनाचा सविस्तर आराखडाही तयार करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. या प्रसंगाच्या अनुषंगाने सर्व नागरिकांना आपल्या ऐतिहासिक वारश्याप्रती जागरूक होऊन त्यांचे जतन व संवर्धन करणेबाबत व आपल्या या वारश्यास कोणत्याही स्वरूपाची हानी होणार नाही याची दक्षता घेणेबाबत पुरातत्त्व विभाग आव्हान करत आहे. कोणत्याही वारसा स्थळी अश्या स्वरूपाचा गैरवर्तन होत असल्याचे आढळून आल्यास तेथील लोकांना या वारसावैभवाप्रती जागरूकता निर्माण करून दिली पाहिजेत, श्रद्धा ही डोळस असावी ही जाणीव निर्माण करून दिली पाहिजे...!

पुरातत्त्व विभाग तर आपले कार्य करत असतेच परंतु वारसा जतन करण्याच्या कार्यात सामान्य नागरिकांचे योगदान असणेही तेवढेच अपेक्षित आहे. शेवटी ही गोष्ट प्रत्येकाने लक्षात घ्यायला हवी की, सांस्कृतिक वारसा हा लोकांद्वारे, लोकांचा, लोकांकरिता आहे.

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# स्टील पट्टी समजून डोळ्यात निघाला चाकू..!



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तरुणाच्या डोळ्यात खोलवर पातूची पट्टी गेली होती. त्यामुळे त्याने नंदुरबार जिल्हा रुग्णालयात धाव घेतली. परंतु ही शस्त्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची असल्याने या रुग्णाला धुळ्यातील भाऊसाहेब हिरे रुग्णालयात संदर्भीत करण्यात आले. त्यानुसार मध्यरात्रीनंतर २.३० वाजेच्या सुमरास हा रुग्ण हरे रुग्णालयात दाखल झाला. या रुग्णावर उपचार करण्याची जबाबदारी अधीष्ठाता डॉ. अरुण मोरे यांनी नेत्ररोग तज्ञ तथा वैद्यकीय अधीक्षक डॉ. मुकर्रम खान यांच्यावर सोपवली. तसेच सदर रुग्णाची आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्याने त्याच्यावर योग्य ते उपचार करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार डॉ. मुकर्रम खान यांनी रुग्णाची प्राथमिक तपासणी केली.

विलन सोमा भिलावे रा. कोठला, ता. तळोदा, जि. नंदुरबार या ४० वर्षीय तरुणाचे नाव असून रुग्णाच्या नातलगांनी सांगितल्यावरून डोळ्यात खोलवर पट्टी असल्याचे सांगितले. पट्टीसारखे धातू असल्याने शस्त्रक्रिया करताना नाक, कान व घशालाही इजा होण्याची भीती होती. त्यामुळे ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया करताना काहीही होण्याची भीती डॉक्टरांना होती. परंतु, वैद्यकीय अधीक्षक डॉ. मुकर्रम खान यांनी त्यांच्या मोठ्या अनुभव पणाला लावत या रुग्णाच्या डोळ्यातून पट्टी यशस्वीपणे काढली. मात्र, ही पट्टी नसून तो तब्बल ६ इंची चाकू असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे डॉक्टरांसह पथकही चकीत झाले.

त्यावेळी त्यांना डोळ्यात खोलवर धातूची पट्टी गेल्याचे धातूची पट्टी गेल्याचे निदर्शनास आले. रुग्णाला त्रासही होत होता. शिवाय त्या डोळ्याने रुग्णाला कमी दिसत होते. त्यामुळे ही शस्त्रक्रिया करणे मोठे आव्हान होते. कारण या पट्टीमुळे कान, नाक व घशालाही इजा झालेली असण्याची भीती डॉक्टरांना होती. शस्त्रक्रिया करताना काहीही होण्याची शक्यताही डॉक्टरांनी व्यक्त केली होती. त्यामुळे डॉ. खान यांनी लागलीच नाक, कान व घशाच्या डॉक्टरांनाही शस्त्रक्रियेसाठी पाचारण केले. डॉक्टरांचे पथक दाखल झाल्यानंतर पहाटे रुग्णावर शस्त्रक्रिया करण्यात आली.

शस्त्रक्रियेदरम्यान ही पट्टी यातून हळूहळू काढत असताना ती पट्टी नसून चाकू असल्याचे डॉ. खान यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे डॉक्टरांसह पथकही चक्रावले. तब्बल ६ इंचाचा हा चाकू होता. डॉ. खान व त्यांच्या पथकाने अखेर ही गुंतागुतीची शस्त्रक्रिया यशस्वी करत चाकू बाहेर काढला. या शस्त्रक्रियेसाठी डॉ. मुकर्रम खान यांना त्यांचे सहकारी दीपाली गवई, विजय श्रीतोंडे व कर्मचाऱ्याचे सहकार्य लाभले.



## मोसंबी फळ उत्पादक बागदारांना फळ गळती फटका

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** तालुक्यात सर्वांत जास्त मोसंबी उत्पादन या परिसरामध्ये होते. मात्र यंदा मोसंबी पिकावर अज्ञात रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने बहरलेल्या मोसंबीला गळती लागली आहे. सततच्या पावसाने मोसंबी पिकाला दगा दिला आहे. शेतकऱ्यांच्या यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने मोसंबी बागायतदार शेतकरी चिंतेत सापडलेला आहे.

दरवर्षी शेतकरी मोसंबीचे उत्पादन घेतात. जीवाचा आटापिटा करून मोसंबीचे पीक राखण्याकरिता खर्च करतात; मात्र यावर्षी बहरलेल्या मोसंबी पिकावर अज्ञात रोगाच्या प्रादुर्भावाने गळती लागली आहे. यात आता पावसाळी वातावरणाची भर पडली आहे. सद्यस्थितीत प्रत्येक बागेमध्ये अक्षरशः मोसंबी फळांचा खच जमिनीवर पडलेला दिसून येत आहे. शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. कर्ज, उसनवारी करुन संत्रा व मोसंबी उत्पादकांनी फळबाग बहरविली. खर्च करून देखील तुर्तास मोसंबी विकून उत्पादन हातात येण्याच्या अगोदरच अज्ञात रोगाच्या प्रादुर्भावामुळे मोठे आर्थिक संकट ओढवले आहे..

कृषी विभाग कुठल्याही प्रकारची मदत शेतकऱ्यांना करत नाही. मोसंबीवर आलेला हा बुरशीजन्य रोग आहे. सततच्या पावसामुळे आणि ढगाळ वातावरणामुळे हा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर आहे. यामुळे फळांवर डाग पडणे, फळ गळणे असे प्रकार घडतात. शेतकऱ्यांना पीक विम्याचा फायदा नाही. दरवर्षी कष्ट करुन मोसंबीचे पीक उभे करतो. त्यासाठी बँकेकडून मोठ्या प्रमाणावर कर्ज देखील घेतो. नैसर्गिक संकटांमुळे होणारी पिकाची नासाडी आणि त्यातून वाट्याला येणारे नुकसान टाळण्यासाठी तो पीक विमा उतरवितो. मात्र, आजपर्यंत मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन देखील कुठल्याच शेतकऱ्याला पीक विम्याचा फायदा जर आहे. शिंदे वडगांव येथील मोसंबी बागातदार शेतकरी नारायण दवे यांनी मुख्यमंत्री कार्यालयाला ईमेल द्वारे मोसंबी फळगळती व्यथा मांडली आहे. मोसंबी बागातदार शेतकऱ्यांना कृषी विभागाने लवकरात लवकर पंचनामा करून शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

## राष्ट्रीय क्रांती सेना पक्षाचा मेळावा व पक्षप्रवेश सोहळा

आधुनिक केसरी न्यूज



**परतूर :** दि.9 रोजी राष्ट्रीय क्रांती सेना पक्षाचा मराठवाडा विभागीय मेळावा व पक्ष प्रवेश सोहळा हा मराठवाडा महसूल प्रबोधणी, औरंगाबाद येथे पार पडला. कामगार नेते भाई नानासाहेब लकारे यांनी पक्ष प्रवेश केला. त्यांची मराठवाडा कार्याध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली.

गणपत अशोक खिरे कामगार आघाडी तालुकाध्यक्ष परळी, हरिनारायण गवळी सामान्य प्रशासन व सामाजिक न्याय विभाग मराठवाडा कार्याध्यक्ष, सुनील रामकृष्ण पाटील जळगाव जिल्हा संपर्कप्रमुख, कोंडीबा प्रकाश ढगे नांदेड उत्तर शहर अध्यक्ष, दशरथ जोहर सिंग राठोड नांदेड कामगार सहसचिव, परमेश्वर चुंबळे संभाजीनगर उद्योग आघाडी, हिरामन लहरे जिंतुर तालुका अध्यक्ष, विठ्ठल आनंदा टिव्हे कामगार आघाडी जिल्हा उपाध्यक्ष परभणी, पुरण कांता कुटारे कामगार आघाडी जिल्हा सचिव परभणी, सौ.पुष्पा सिरसाठ महिला सचिव संभाजीनगर, सौ. शाकुंतला घुंगासे महिला तालुका अध्यक्ष गेवराई, सौ. लता सुनिल पवार चिकलठाणा महिला अध्यक्ष संभाजीनगर, सौ. रुख्मिना विलास आडे महिला तालुका अध्यक्ष जिंतूर, ज्ञानेश्वर रोहिदास गव्हाणे युवा कामगार आघाडी तालुकाध्यक्ष जिंतूर, शेख सुभान शेख तालुका उपाध्यक्ष अल्पसंख्यांक सेनगाव, शब्बीर खान जफार खान पठाण तालुका अध्यक्ष अल्पसंख्यांक सेनगाव यांच्यासह अशा शेकडो कार्यकर्त्यांची निवड क्रांती सेना पक्षात वेगवेगळ्या पदावर करण्यात आली.

शेकडोंच्या संख्येने परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, संभाजीनगर अशा मराठवाड्यातील वेगवेगळे जिल्ह्यातून राष्ट्रीय क्रांती सेना पक्षात प्रवेश केला. याप्रसंगी उपस्थित राष्ट्रीय क्रांती सेना पक्षाचे संस्थापक अध्यक्ष परमेश्वर मुंडे, प्रदेश कार्याध्यक्ष नरेंद्र सांगळे, प्रदेश सचिव ॲड. कृष्णा घुले, संपर्कप्रमुख बुलढाणा चे गजानन पालवे, जिल्हा उपाध्यक्ष संभाजीनगर राजेंद्र वाघ आदी पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भरत वाघ यांनी केले तसेच कार्यक्रमाचा समारोप गजानन पालवे यांनी केला.




अतिक्रमणांवर कारवाई क्रीडा उपसंचालक यांच्या जागेवर पडेगाव मेन रोड गट नंबर 23 वर अनधिकृतपणे बांधकाम करून अतिक्रमण केले होते. यावेळी मनपाचे अतिरिक्त आयुक्त रविंद्र निकम, तहसीलदार चव्हाण, क्रीडा उप संचालक पाटील, क्रीडाधिकारी घुगे, पोलीस निरीक्षक शरद इंगळे, पीएसआय सचिन वायाळ, तलाठी सोनवणे इत्यादी सर्व वरिष्ठ अधिकारी कर्मचारी छायाचित्रात दिसत आहे.

## ७५० स्पर्धकांनी घेतला मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग

### पैठणमध्ये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव विविध उपक्रमांनी साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यात विविध ठिकाणी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सांस्कृतिक उपक्रमांनी साजरा केला जात आहे. १० ऑगस्ट रोजी पैठण शहरात या निमित्ताने सर्वच शासकीय कार्यालयाच्या पुढाकाराने मँरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात जवळपास ७५० नागरिकांनी सहभाग नोंदवला. पैठण पोलीस स्टेशनच्या प्रमुख पुढाकाराने व तहसील कार्यालय नगर परिषद कार्यालय पैठण यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दिनांक 10 ऑगस्ट रोजी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौकातून मॅरेथॉन स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.

पैठण न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश एस. एन. भावसार यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून मॅरेथॉन स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जायकवाडी धरण भिंतीवरील मुख्य कमानीपर्यंत अशी तब्बल दोन किमी मॅरेथॉन दौड संपन्न झाली. या मॅरेथॉन स्पर्धेत उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल, तहसीलदार दत्तात्रय निलावाड, नगरपरिषद मुख्याधिकारी संतोष आगळे, नायब तहसीलदार गिरीजाशंकर आवळे, व्यंकटी पापुलवार, सचिन आगलावे, (पोलीस) मनोज वैद्य यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये स्पर्धा पार पडली.

नाथसागर येथे सामुहिक राष्ट्रगीत घेण्यात आले. या स्पर्धेत दादासाहेब नलभे, वैभव भुजबळ, सुरज दिलवाले, शरद जाधव, राजेंद्र शिंदे, अनिल सोलनकर हे पुरुष गटातून विजयी झाले तर महिला गटातून स्वाती लहाने (PSI), कोकिळा काळे (पोलीस) व सुनिता जाधव (शिक्षिका) यांना विजयी घोषित करण्यात आले. यावेळी डॉ. राम लोंढे, शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहिया, सचिव बलराम लोळगे, सचिन उंडाळे, उमेश तट्टू यांच्यासह पैठण शहरातील व्यापारी, डॉक्टर्स, शिक्षक, वकील व सर्व शासकीय कार्यालयातील कर्मचारी सहभागी झाले होते.



## घरोघरी तिरंगा अभियानांतर्गत मनसे जनसंपर्क कार्यालय चिखली येथे ध्वज खरेदीसाठी उपलब्ध

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त घरोघरी तिरंगा अभियान राबविण्यात येत आहे. नागरिकांना तिरंगा ध्वज सहज उपलब्ध व्हावा यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना जनसंपर्क कार्यालय चिखली येथे मनसे जिल्हाध्यक्ष गणेश बरबडे, उपजिल्हाध्यक्ष राजेश परिहार, शेतकरी सेलचे जिल्हा संघटक शैलेश गोंधणे, मनविसे जिल्हाध्यक्ष शैलेंद्र कापसे, मनशे सेलचे जिल्हाध्यक्ष प्रदीप भवर यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीमध्ये दि.१० ऑगस्ट ते १२ ऑगस्ट रोजी पर्यंत मनसेच्या वतीने महाराष्ट्र नवनिर्माण सेना जनसंपर्क कार्यालय चिखली येथे शासनाने ठरविलेल्या ध्वज २५ रुपये व दांडा ५ रुपये असे एकूण ३० रू प्रती ध्वज प्रमाणे ध्वज विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यावेळी उप तालुकाध्यक्ष संदीप नरवाडे, तालुका सचिव प्रवीण देशमुख, एकनाथ खरपास, संजय दळवी, मेरा शाखाध्यक्ष वैभव पडघान, संकेत काळे, अंकित इंगळे यांसह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. प्रत्येक नागरिकांच्या मनात देशभावना वृद्धिंगत करण्यासाठी घरोघरी तिरंगा अभियान स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात राबविण्यात येत असुन ज्या नागरिकांना भारतीय तिरंगा ध्वज खरेदी करायचा चिखली येथील मनसे जनसंपर्क कार्यालयावरून ध्वज खरेदी करावा, असे आवाहन मनसे जिल्हाध्यक्ष गणेश बरबडे यांनी केले आहे. तसेच स्वातंत्र्य दिनी दि. 15 ऑगस्ट 2022 रोजी सकाळी ७:३० वाजता मनसे जनसंपर्क कार्यालय चिखली येथे ध्वजारोहण होणार आहे तरी सर्व नागरिकांनी आवर्जून उपस्थित रहावे.

## शिंदखेड्यात रॅली काढून जागतिक आदिवासी दिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज



**शिंदखेडा :** तालुक्यातील 9 ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने आदिवासी, कुलदैवत याहामोगी माता, आदिवासी क्रांतिकार तंटया भिल, खाजा नाईक, बिरसा मुंडा, भगवान विर एकलव्य, जयपालसिंह मुंडा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून मिरवणूक शुभारंभ करण्यात आला. तसेच या कार्यक्रमाचे नियोजन आदिवासी एकता परिषद आदिवासी टायगर सेना, यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सुभाष दादा नाईक, कार्यक्रमाचे उद्घाटक प्रवीण मोरे, गुलाब सोनवणे, किशोर ठाकरे, संजय महाले, विकास देवरे, भूपेंद्र देवरे, शंकर मोरे, राजेंद्र फुले, दीपक फुले, अजय पवार, कृष्णा मालचे, अनिल कुवर, रवींद्र ठाकरे, शांताराम सोनवणे तसेच यावेळी तालुक्यातील सर्व कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# सर्वधर्मीय गुरुंची उपस्थिती व तीनशे फूट तिरंगा रॅलीने वेधले पैठणकरांचे लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर, पैठण यांच्या वतीने आयोजित केलेल्या तिरंगा रॅलीचे उद्घाटन गागाभट चौक या ठिकाणी करण्यात आले. ही रॅली एकात्मतेचा संदेश देणारी ठरली.
रॅलीचे उद्घाटन सर्वधर्मीय धर्मगुरूंच्या शुभहस्ते महापुरुष व क्रांतीकारकांच्या प्रतिमेचे पूजन व तिरंगी ध्वज उंचावत करण्यात आले.
या रॅली प्रसंगी संत एकनाथ महाराजांचे वंशज ह.भ.प. रघुनाथ महाराज गोसावी, मौलाना साहेब दर्गा चे मुख्य इमाम व खतिब मोहम्मद सादिक गुलाम मिर्झा, जैन संप्रदाय दिपक महाराज जैन, भारत वर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र महाराष्ट्र अचल चे अध्यक्ष संजय पापडीवाल, बौद्ध धर्माचे परमपूज्य आनंद भन्ते, सिख, उदासी व सिंधी उत्सव साजरे कर्ते नानकजी वेदी, श्रीकृष्ण महानुभव पंथ चे महंत चक्रपाणी बाबा शेवलीकर आदी धर्मगुरूच्या शुभ हस्ते रॅलीचे उद्घाटन करण्यात आले.
याप्रसंगी शाळेचे अध्यक्ष डॉ. पद्मकुमार कासलीवाल, कार्यवाह जुगलकिशोर लोहिया, डॉ. राम लोंढे, किशोर भाकरे, पैठण न्यायालयाचे न्यायाधीश सचिन भावसार, ॲड. सी.आर. कुलकर्णी, ॲड. पटवर्धन, रामनाथ केकान, यज्ञेश गोसावी, प्रभारी मुख्याध्यापक प्रमोद काकडे आदी मान्यवर उपस्थित होते.
भारताची आन बाण आणि शान असलेल्या तीनशे फुट लांब तिरंग्याने पैठणकरांचे लक्ष वेधून घेतले होते. यावेळी ही रॅली गागाभट्ट चौक- छत्रपती शिवाजी महाराज पुतळा -मेन रोड -खंडोबा मंदिर- नाथ मंदिर -मार्गे गागाभट्ट अशी संपन्न झाली. या भावस्पर्शी अशा रॅलीने पैठणकरांचे व उपस्थित त्यांचे मन भारावून गेले होते. याप्रसंगी भारत माता की जय, वंदे मातरम च्या घोषणेने सर्व परिसर दुमदुमून निघाला होता. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व वाहन चालक अंकल यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विलास खर्डेकर यांनी केले.



# जामनेरमध्ये बंजारा समाजाचा तीज उत्सव साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** जामनेरमध्ये बंजारा समाजातर्फे तीज उत्सव अत्यंत उत्साहात व श्रद्धेय श्री श्याम चैतन्य जी महाराज तसेच शेकडो महिला व पुरुष यांच्या उपस्थितीत पार पडला.
हजारो वर्षापासून बंजारा समाज आपली संस्कृती व परंपरा अविरत चालू ठेवत आहे त्याचच हे एक मूर्तीमंत उदाहरण असून येणाऱ्या पिढीला समाजाची संस्कृती व परंपरा अशीच कळत राहावी याकरिता दरवर्षी जामनेर शहरांमध्ये तीज उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो आणि त्या माध्यमातून संस्कृतीचा एक विलोभनीय प्रदर्शन त्या माध्यमातून होत असत.
यावेळी उपस्थित महिलांनी बंजारा समाजातील तीज गीत गाऊन येणाऱ्या पिढीला परंपरेची ओळख करून दिली.
यावेळी गुरुदेव सेवा आश्रमचे श्रद्धेय श्याम चैतन्य महाराज, चतरसिंग राठोड, भुरासिंग राठोड, राजेश नाईक, ममराज तंवर, निलेश चव्हाण, दीपक चव्हाण, डॉ. प्रकाश चव्हाण, हेमराज नाईक, विकास तंवर, सुभाष चव्हाण, बाबू सिंग चव्हाण, अक्षय जाधव, रोहन चव्हाण, राठोड अप्पा, महिला भगिनींतर्फे सौ. अंजू पवार, सौ. सविता राठोड, चव्हाण, राठोड, जाधव, तंवर या उपस्थित होत्या.



# घरो घरी तिरंगा मोहिमेत सर्वांनी योगदान द्यावे

## दि चिखली अर्बन बँकेचे अध्यक्ष सतीश गुप्त यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त शासनाच्या वतीने १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत 'घरो घरी तिरंगा' अभियान साजरा केले जाणार आहे. या अभियानात सर्वांनी सहभागी होऊन योगदान द्यावे, असे आवाहन दि चिखली अर्बन बँकेचे अध्यक्ष सतीश गुप्त यांनी केले आहे.
'स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव' अंतर्गत १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीमध्ये केंद्र शासनाच्या सूचनेनुसार घरो घरी तिरंगा तसेच स्वराज्य महोत्सव यांचे आयोजन करून हा उपक्रम देशात यशस्वी करण्यासाठी सूचना दिल्या आहेत. घरो घरी तिरंगा हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रसार, प्रचार,व जाणीव जागृती मोहिमेसाठी सांस्कृतिक कार्य विभागाने जिंगल, गीते, ध्वनी चित्रफीत, जाहिराती, लघुपट, सेलिब्रिटींच्या माध्यमातून आवाहन व पोस्टरची निर्मिती केली आहे. ती शासनाच्या HTTPS://MAHA AMRUT.ORG या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.



नागरिकांना या मोहिमेत सहभागी होण्यासाठी २७ रुपये प्रति ध्वजप्रमाणे ध्वज विक्रीसाठी उपलब्ध करून देणार असल्याचे दि चिखली अर्बन बँकेचे अध्यक्ष सतीश गुप्त यांनी यावेळी सांगितले. राष्ट्रध्वज संहितेचे पालन होणे व जाणते अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अवमान होऊ नये याची दक्षता घेऊन नागरिकांनी काळजी घेणे आवश्यक आहे.
चिखली तालुक्यातील सर्वांनी घरो घरी तिरंगा या मोहिमेत सहभागी होऊन आपले योगदान द्यावे, असे आवाहन दि चिखली अर्बन बँकेचे अध्यक्ष सतीश गुप्त यांनी केले आहे.

# साकेत प्रकाशनातर्फे सुधीर सेवेकरांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सुधीर सेवेकरांनी लिहिलेली "रत्न टाटा" व "ॲमेझॉन" या चरित्रात्मक पुस्तकांचे साकेत बुकवर्ड या ग्रंथालयात प्रकाशन उत्साहात संपन्न झाले. उद्योजक सुनिल किर्दक आणि उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांदोघांच्या हस्ते या दोन पुस्तकांचे प्रकाशन उत्साहात संपन्न झाले.
याप्रसंगी बोलताना सुनील किर्दक म्हणाले, रतन टाटांनी जो दृष्टीकोन व्यवसायात ठेवला तोच आदर्श आजच्या उद्योजकांनी ठेवला पाहिजे. रतन टाटा हे आम्हां उद्योजकांचे उद्योग व्यवसायातील संतच आहेत. पालकांनीच घरात लहान मुलांच्या वाढदिवसाला पुस्तकेंच हातात भेट म्हणून दिली तर मुलांना वाचनाची आवड निर्माण होईल.
उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर बोलताना म्हणाल्या, चरित्रात्मक पुस्तकंचे लिखाण अवघड असते मात्र सुधीर सेवेकरांची लिखाणाची पध्दत अभ्यासपूर्ण मनोवेधक आहे. हाच उद्योजक समाज घडवित असतो म्हणूनच अशा उद्योजकांची ही प्रेरणादायी चरित्रे नेहमीच वाचावयास हवीत.
रतन टाटा व ॲमेझॉन या पुस्तकांचे लेखक सुधीर सेवेकर आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, कथासंग्रह.. काव्यसंग्रह.. कादंबऱ्या.. वाचनाच्या बरोबर समाज घडवणाऱ्या समाजाला भरभरुन संपत्ती व रोजगार देणाऱ्या अशा उद्योजकांची जीवन चरित्र ही अनमोल आहे. आपलं संपूर्ण जीवन हे अशा उद्योगात समर्पित करणाऱ्या अशा उद्योगामुळेच देश संपन्न नी समृद्ध होत असतो म्हणून अशा उद्योजकांची ही पुस्तके प्रत्येकांनीच वाचली पाहिजेत, असेही सुधीर सेवेकर म्हणाले.
प्रकाशन सोहाळ्याचे प्रास्ताविक प्रतिमा भांड यांनी केले. सारंग टाकळकर यांनी सुत्रसंचालन केले. तर ज्योती नांदेडकर हिने आभार मानले. प्रकाशन सोहळ्यास बाबा भांड, आशा भांड, साकेत भांड, सुधीर कोर्टीकर, नयन कोर्टीकर, शैलजा सेवेकर, सुजाता दाणी, वर्षा कंधारकर, भाऊ सुरडकर, संजीव गोडवे, सुनील कस्तुरे, सुबोध राजूरकर, राजेश लहुरीकर यांची उपस्थिती होती.



# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## लैंगिक समस्या निदान व उपचार...

आधुनिक केसरी

**हस्तमैथुन :** पुरुष आणि स्त्री या दोघांमध्येही हस्तमैथुन हा प्रकार असतो. मात्र तुलनेने पुरुषांमध्ये हे प्रमाण आधिक आढळून येते. हस्तमैथुनाबाबात समाजामध्ये खूप अज्ञान आहे. गैरसमजुती आहेत, हस्तमैथुनाचे परिणाम, दुष्परिणाम याविषयीसुद्धा अनेक समज-गैरसमज आहेत. वयात आल्यानंतर उत्तेजना निर्माण होते आणि ती शमविण्यासाठीच हा एक मार्ग आहे. मानसिक तणावांतून दिलासा, स्वतःच्या शरीराची ओळख, सेक्सचा प्रथमानुभव असे या हस्तमैथुनाचे लाभ सांगता येतील. मात्र आपल्या मराठीत जी म्हण आहे , 'अति तिथे माती' ती या हस्तमैथुनाच्या बाबतीत अगदी तंतोतंत लागू पडते. अतिहस्तमैथुनामुळे अनेक समस्या उद्‌भवतात. यामध्ये प्रामुख्याने थकवा येणे, जोडीदाराबद्दल निरुत्साह, मूळ क्रियेचे अनाकर्षण, स्वप्नरंजनातच स्वारस्य अशा समस्यांचा समावेश होतो. या सगळ्या समस्यांचा थेट परिणाम वैवाहिक जीवनावर झालेला दिसून येतो.
**स्वप्नदोष :** पुरुष आणि स्त्री या दोघांमध्येही आढळणारी ही आणखी एक सर्व समस्या, झोपेत नकळतपणे वीर्यपतन किंवा स्त्राव बाहेर येणे म्हणजे स्वप्नदोष, कुमारवयातून प्रौढत्व येण्यास सुरुवात होते तेव्हा सामान्यतः हा दोष आढळतो. वयानुरुप तो बरा देखील होतो. मात्र काही जणांमध्ये तो कायमचा राहतो. झोपेत स्वप्नरंजनातून ही समस्या उद्‌भवते. शारीरिक, मानसिक व्याधी आणि तणाव यामुळे देखील स्वप्नदोष बळावतो. हस्तमैथुनामुळे सुद्धा ही समस्या उद्‌भवू शकते. अतिहस्तमैथुनामुळे शरीरात टेस्टेस्टेरॉन या हार्मोनची पातळी वाढून अधिक प्रमाणात वीर्य तयार होते. हे जास्तीचे प्रमाण स्वप्नदोषातून बाहेर पडते. तसेच जननेंद्रीयांचे स्नायू व मज्जायातंतू कमकुवत होऊन सूज येते यामुळे वीर्यस्खलनावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा कमकुवत होते. आणि परिणामी स्वप्नदोष होतो. स्वप्नदोष टाळण्यासाठी अनेक उपाय आहेत. रात्री झोपण्याआधी न विसरता मुत्रविसर्जन करणे, ग्रीन टी किंवा साधा चहा घेणे. तसेच वैद्यकीय उपायांमध्ये उत्कृष्ट गोळ्या, औषधी, मलम उपलब्ध आहेत. मात्र त्याचा वापर योग्य डॉक्टरांच्या सल्ल्यानेच करावा.

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# शिंदखेड्यात काँग्रेसतर्फे आझादी गौरव पदयात्रा



आधुनिक केसरी न्यूज

**शिंदखेडा :** संपूर्ण देशभरात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त काँग्रेसतर्फे आझादी गौरव पदयात्रा काढण्यात येत आहे. त्यानुसार जिल्ह्यात शिंदखेडा तालुक्यातील क्रांती स्मारकपासून पदयात्रा काढण्यात आली. यावेळी माजी मंत्री डॉ. हेमंत देशमुख, आमदार कुणाल पाटील, उपाध्यक्ष भा.ई. नगराळे, जिल्हाध्यक्ष श्यामकांत सनेर, तालुकाध्यक्ष रावसाहेब पवार, डॉ. दरबारसिंग गिरासे, डॉ. रवींद्र देशमुख, न.प.चे विरोधी पक्षनेते सुनील चौधरी, हेमराज पाटील, प्रकाश पाटील, राजेंद्र देवरे, अरुण पाटील, प्रमोद सिसोदे, राहुल माणिक, तालुकाध्यक्ष सोनू झालसे, पंकज चव्हाण, अशोक सोडके, महिला आघाडीच्या छाया पवार, अनिता गिरासे, बानूबाई शिरसाट, प्रतिभा पवार, भावना पवार, सुनीता माडगे, वसंत कोळी, मुन्ना खाटीक, विलास गोसावी, कय्युम दादा पठाण, बिलाल बागवान आदी सहभागी झाले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in